दैनिक
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

वैभव विवेक स्वामी
सपादक

राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष – ६ वे अंक –८१ | बुधवार दि.२६ नोव्हेंबर २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू । पाने ४

Beed | Daily Marathi | Year-6th | Issue-81 | Wednesday, Dt.26 November 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

# अनंत गर्जेच्या घरात काय चाललंय मला कसं कळणार?

## कल्पना असती तर त्याच्या दोन कानाखाली लावल्या असत्या, पंकजा मुंडेंचा संताप

बीड /प्रतिनिधी

माझ्या ३६ कर्मचाऱ्यांच्या स्टाफमध्ये कोणाच्या घरात काय चाललंय, याची मला कल्पना कशी असणार? पण अनंत गर्जेबद्दल मला थोडी जरी कल्पना असती, तर मी त्याच्या दोन कानाखाली लावून त्याला सरळ केले असते, अशा शब्दांत राज्याच्या मंत्री पंकजा मुंडे यांनी आपला संताप व्यक्त केला. आपले स्वीय सहायक अनंत गर्जे यांच्या पत्नी डॉ. गौरी पालवे यांच्या दुर्दैवी मृत्यूनंतर आज पंकजा मुंडे यांनी गौरीच्या कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. यावेळी त्यांनी पीडित कुटुंबाला न्याय मिळवून देण्यासाठी आपण कोणालाही पाठीशी घालणार नसल्याचा शब्द दिला.





गेल्या शनिवारी २२ नोव्हेंबर रोजी रात्री पंकजा मुंडे यांचा पीए अनंत गर्जे याची पत्नी डॉ. गौरी पालवे यांनी राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली होती. विशेष म्हणजे, या दोघांचे लग्न होऊन अवघे १० महिने झाले होते. या प्रकरणी गौरीच्या वडिलांनी अनंत गर्जेवर गंभीर आरोप केल्यानंतर, वरळी पोलिसांनी अनंत गर्जेला अटक केली आहे. दरम्यान, आज पंकजा मुंडे यांनी गौरीच्या घरी भेट देत पालवे कुटुंबाचे सांत्वन केले.

### स्टाफच्या घरात काय चाललंय हे कसं कळणार?

अनंत गर्जेच्या वर्तणुकीबद्दल बोलताना पंकजा मुंडे म्हणाल्या, माझ्याकडे १० पीए आहेत आणि एकूण ३६ जणांचा स्टाफ आहे. हे सर्वजण पगारी कर्मचारी आहेत. कामाच्या ठिकाणी ते व्यवस्थित वागत असतील, पण त्यांच्या चार भिंतींच्या आड घरात काय चालले आहे, हे मला माहिती असणे शक्य नाही. अनंत गर्जेबाबत माझ्याकडे कधीही कोणतीही तक्रार आली नव्हती. ही घटना समजली तेव्हा मला स्वतःला मोठा धक्का बसला. जर मला आधी काही माहिती असते, तर मी नक्कीच हस्तक्षेप केला असता.

### नेमके काय म्हणाल्या पंकजा मुंडे?

गौरीच्या वडिलांच्या घरी सांत्वनपर भेटीसाठी गेलेल्या पंकजा मुंडे भावूक झाल्या होत्या. त्या म्हणाल्या, मी भगवान बाबा आणि लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांची शपथ घेऊन सांगते की, मी या प्रकरणात पोलिसांना एकही फोन केलेला नाही आणि भविष्यातही करणार नाही. जे चूक आहे, त्याला शिक्षा झालीच पाहिजे. मी घटनास्थळी उपस्थित नव्हते, त्यामुळे तिथे काय घडले हे मी सांगू शकत नाही. पण तपासात जे सत्य येईल, त्यानुसार दोषींवर कठोर कारवाई होईल.

## नगरपालिका निवडणुकीची संपूर्ण प्रक्रिया निर्विघ्नपणे पार पडेल

### 'सर्वोच्च' सुनावणीनंतर काय म्हणाले सीएम फडणवीस





मुंबई : राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची रणधुमाळी सुरू असून प्रचारालाही वेग आला आहे. मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री प्रचाराच्या मैदानात उतरले असून एकीकडे प्रचाराचा धुरळा उडत असताना दुसरीकडे सर्वोच्च न्यायालयात निवडणुकांवर टांगती तलवार असल्याचं पाहायला मिळत आहे. ओबीसी आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडून निवडणूक घेता येणार नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. न्यायालयात आज झालेल्या सुनावणीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपली प्रतिक्रिया दिली. नगरपालिका निवडणुकीची संपूर्ण प्रक्रिया निर्विघ्नपणे पार पडेल ही विनंती न्यायालय मान्य करेल अशी अपेक्षा मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केली.

निवडणुका सुरू झालेल्या आहेत, सगळी प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. येत्या २ तारखेला मतदान होणार असल्याने संपूर्ण प्रक्रिया निर्विघ्नपणे पार पडेल ही विनंती सर्वोच्च न्यायालय मान्य करेल अशी अपेक्षा असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले. सर्वोच्च न्यायालयाने आजही बोलताना ओबीसी आरक्षणाबाबत सकारात्मक टिप्पणी केलेली आहे. इतकच नाही तर आधीच्या निर्णयाचं पुन्हा पुनरावलोकन करणे आवश्यक असल्याची टिप्पणी देखील त्यांनी केली. त्यामुळे, आज

(उर्वरीत पान २ वर)

# माजीमंत्री अशोक पाटील यांनी बीड जिल्ह्यात काँग्रेस पक्ष आणि पंजा हे चिन्ह जिवंत ठेवले..!

## बीडसह परळी, अंबाजोगाई, गेवराई नगराध्यक्षांसह सर्व सहा नगरपालिकेत काँग्रेसचे उमेदवार रिंगणात ?















### कोणाच्या ओंजळीने नव्हे तर मातबरांना पाणी पाजण्यासाठी काँग्रेस मैदानात ?

माजी मंत्री अशोक पाटील, काँग्रेस पक्षाच्या विद्यमान खासदार रजनीताई पाटील या दाम्पत्यांनी गांधी परिवाराशी असलेली एकनिष्ठता कायम जपली, हे बीड जिल्ह्यालाच नव्हे तर देशाला माहित आहे. कोणाच्या ओंजळीने पाणी पिण्यासाठी काँग्रेस पक्षाने उमेदवार उभे केले नाहीत. तर मातब्बर धर्मांध शक्तीला पाणी पाजण्यासाठी उमेदवार उभे करून कार्यकर्त्यांना बळ दिल आहे हे नाकारून चालणार नाही.



### काँग्रेस आणि गांधी परिवाराला बीडमध्ये पाटील दांपत्यांनी जिवंत ठेवले

बीड जिल्ह्यामध्ये काँग्रेस हा पक्ष राष्ट्रीय पक्ष आहे, या पक्षाने आपले पुरोगामित्व सोडलेले नाही आणि गांधी परिवाराने काँग्रेस पक्षासह या देशासाठी केलेला त्याग बीड जिल्ह्यामध्ये कायम जिवंत ठेवण्याचा प्रयत्न पाटील दांपत्यांनी केला आहे. बीडच्या जनतेला इंदिरा गांधी, राजीव गांधी, सोनिया गांधी, राहुल गांधी, प्रियंका गांधी यांचे प्रत्यक्ष दर्शन घडवण्याचे कार्य याच पाटील दांपत्याने केले आहे यात शंका नाही.

बीड / वैभव स्वामी

बीड जिल्ह्यामध्ये काँग्रेस आय हा पक्ष माजी मंत्री अशोक पाटील यांनी निवडणुकांच्या माध्यमातून कायम कार्यकर्त्यांसाठी जिवंत ठेवला. लोकसभा निवडणूक असेल विधानसभा निवडणुका असतील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका असतील या निवडणुकीत उमेदवार उभे करून त्यांनी काँग्रेस पक्ष आणि पक्षाचे चिन्ह पंजा हे लोकांच्या स्मरणात ठेवण्याचा प्रयत्न निश्चितच केला आहे. बीड जिल्ह्यातील सर्व सहा नगरपालिकेमध्ये काँग्रेस पक्षाचे उमेदवार उभे असल्यामुळे सर्वच मातब्बर म्हणणाऱ्या राजकीय पक्षांची राजकीय समीकरणे बदलली आहेत हे मात्र नक्की. सद्यस्थितीत बीड जिल्ह्यामध्ये बीड सह सहा नगरपालिकांच्या निवडणुका होत आहेत. या निवडणुका कार्यकर्त्यांच्या असतात याची जाणीव ठेवून एकमेव काँग्रेस पक्षाने कार्यकर्त्यांसाठी ही निवडणूक स्वबळावर लढवण्याचा निर्धार केला आणि तो अमलात आणला आहे. त्यांनी महाविकास आघाडी असेल अथवा अन्य कोणत्याही आघाड्यांच्या भानगडीत न पडता काँग्रेस पक्ष आणि पक्षाचे पंजा हे चिन्ह जिवंत ठेवण्यासाठी कार्यकर्त्यांना राजकीय बळ मिळावे,त्यांना राजकीय प्रतिष्ठा मिळावी यासाठी स्वबळावर लढण्याचा निर्धार केला आहे. बीड नगराध्यक्ष पदासह गाजत असलेल्या परळी नगरपालिकेत, अंबाजोगाई नगरपालिकेत आणि गेवराई नगरपालिकेत सुद्धा काँग्रेस पक्ष नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीत रिंगणात उतरलेला आहे. यासह धारूर, माजलगाव या ठिकाणी सुद्धा नगरसेवक पदासाठी उमेदवार उभे करून कार्यकर्त्यांना आणि पक्षाला बळ देण्याचा प्रयत्न माजी मंत्री अशोक पाटील यांनी केला आहे यात शंका नाही. नगरपालिकेच्या निवडणुकीत माजी मंत्री अशोक पाटील अथवा त्यांच्या कुटुंबातील एकही सदस्य निवडणुकीत उभा नाही. मात्र काँग्रेस पक्षाशी एकनिष्ठ असलेले सामान्य कार्यकर्ते आज निवडणुकीच्या आखाड्यात उभे राहिले आहेत. यामुळे पक्षाचे आणि त्या कार्यकर्त्यांचे राजकीय बळ वाढले आहे

### बी नव्हे तर ए टीम म्हणून काँग्रेसची छबी !

निवडणुकांमध्ये अनेक उमेदवार आणि पक्ष देखील कोणालातरी फायदा व्हावा, कोणाचं तरी नुकसान करावं म्हणून राजकीय डावपेचामध्ये ऍडजेस्टमेंटचे राजकारण करतात. या डजस्टमेंट मध्ये एक तर महायुती, महाआघाडी,शहर विकास आघाडी असे गोंडस नाव दिले जाते, अथवा जाहीर पाठिंबा दिला जातो. मात्र एकमेव पाटील दांपत्यांच्या नेतृत्वाखाली बीड जिल्ह्यातील काँग्रेस पक्ष हा कोणाच्याही दावणीला न बांधता स्वबळावर निवडणुकीच्या आखाड्यात उतरतो आणि निवडणूक लढतो. ही हिम्मत कोणाच्या ओंजळीने पाणी पिण्यासाठी नक्कीच नसते तर कार्यकर्त्यांना बळ आणि पक्षाचा स्वाभिमान जपणे हेच निवडणुकीमध्ये अपेक्षित असते, आणि त्यामुळे लोकशाही जिवंत राहते. ती लोकशाही जिवंत ठेवण्याचे काम बीडमध्ये अशोक पाटील यांच्या काँग्रेसने केले आहे असे म्हटले तर अतिशोक्ती ठरवू नये इतकेच.

### काँग्रेस पक्षाने निवडणुकीत आपले अस्तित्व सिद्ध केले ?

काँग्रेस पक्ष बोटावर मोजण्या एवढा सुद्धा शिल्लक राहिला नाही म्हणून आरोप करणाऱ्या राज्यकर्त्यांना माजी मंत्री अशोक पाटील यांनी कोणतेही प्रत्युत्तर न देता बीड जिल्ह्यातील सर्व सहा नगरपालिकेत उमेदवार उभे करून काँग्रेस पक्ष बोटावर मोजण्याएवढा आहे ? का सामान्य जनतेमध्ये रुजलेला पक्ष आहे ? यावर स्वबळावर उमेदवार उभे करून विचार करण्यासाठी भाग पाडले आहे. असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

### बीड नगराध्यक्षपदाच्या उमेदवार करुणा मस्के यांचा झंजावात !

काँग्रेस पक्षाने बीड नगराध्यक्ष पदासाठी सौ करुणा मिलिंद मस्के या पक्षनिष्ठ असलेल्या सामान्य कार्यकर्त्याला उमेदवारी दिली आहे. या उमेदवाराने बीड शहरातील प्रत्येक वार्डात,गल्लीत, कॉलनीत जाऊन जनजागृती करत काँग्रेस पक्षाला नवसंजीवनी देत मतदारांना जागृत करण्यास सुरुवात केल्यामुळे अनेकांच्या पायाखालची वाळू सरकली आहे.काँग्रेस पक्षाला मिळत असलेली सहानुभूती जर मतांमध्ये परिवर्तित झाली तर बीड नगरपालिकेचा निकाल धक्कादायक लागू शकतो काँग्रेस पक्ष हा बाजीगर ठरू शकतो अशी चर्चा रंगू लागली आहे.

### पक्षनिष्ठ असलेल्या मस्के कुटुंबियांना दिली थेट नगराध्यक्षपदाची संधी !

बीड नगरपालिकेमध्ये नगराध्यक्ष पदासाठी सौ करुणा मिलिंद मस्के या सामान्य पक्षनिष्ठ असलेल्या उमेदवाराला थेट नगराध्यक्ष पदासाठी संधी दिली आहे. यासह तब्बल ३० प्रभागांमध्ये काँग्रेस या चिन्हावर उमेदवार उभे केले आहेत. दुसरीकडे शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष असेल, अजित दादांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष असेल भारतीय जनता पार्टी असेल यांना सर्व ५२ ठिकाणी उमेदवार निवडताना तारेवरची कसरत करावी लागली. उमेदवार शोधावे लागले, हे वास्तव नाकारून चालणार नाही.

# स्वच्छ-सुंदर-हरित अंबडचा शंखनाद

## स्वच्छ प्रतिमा अभ्यास वृत्ती आणि वास्तव जाणणारे नेतृत्व म्हणजेच महायुतीच्या तोफ सौ. देवयानीताई केदार कुलकर्णी

अंबड ।विशेष प्रतिनिधी

अंबड नगरपरिषद निवडणूक २०२५ च्या रणांगणात महायुतीच्या नगराध्यक्षपदाच्या लोकप्रिय उमेदवार सौ.देवयानी केदार कुलकर्णी यांनी आपल्या दमदार आणि दूरदर्शी नेतृत्वाची ठसठशीत छाप उमटवली आहे.विकासाचा भक्कम व्हिजन डॉक्युमेंट जाहीर करून त्यांनी केवळ प्रचाराची दिशा बदलली नाही तर मतदारांच्या मनात विश्वासाचा व विकासाचा तेजोमेघ निर्माण केला आहे. स्वच्छ-सुंदर-हरित अंबड हा त्यांचा संकल्प आता अंबडकरांच्या हृदयात घणाघाती स्वरात घुमताना दिसतो आहे. पाणीप्रश्नावर मोठा ब्रेकथ्रू १३३ कोटींचा मास्टर स्ट्रोक अंबडच्या सर्वात जिव्हाळ्याच्या पाणीप्रश्नावर आमदार नारायण कुचे यांनी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान अंतर्गत अंबडसाठी १.३३ कोटी रुपयांची जायकवाडी ते अंबड स्वतंत्र पाईपलाईनसाठी योजना मंजूर करून आणण्याचा ऐतिहासिक विक्रम रचला आहे. हे काम लवकरच युद्धपातळीवर सुरू होणार असून अंबडकरांना कायमस्वरूपी पाण्याची समस्या मागे टाकता येणार आहे. तसेच नवीन जलस्रोत,गळक्या जुन्या लाईन्सचे नूतनीकरण व आधुनिक वितरण व्यवस्था या सर्वांची अंमलबजावणी तातडीने होणार आहे.कचरामुक्त- स्वच्छ स्मार्ट अंबड शहरातील अस्वच्छतेचा विद्रूप चेहरा बदलण्यासाठी देवयानीताईंनी युद्धपातळीवरील



अभियान हाती घेतले आहे.घराघरातून नियमित कचरा संकलन आधुनिक व वैज्ञानिक कचरा व्यवस्थापन

नालेसफाईचा विशेष मोहीम यामुळे अंबड स्मार्ट सिटीच्या तोडीचे बनवण्याचे त्यांचे स्वप्न प्रत्यक्षात उतरणार आहे. नाईट-व्ह्यू होणार उजळून शहरातील अंधारे कोपरे होणार प्रकाशमान शहरातील प्रमुख चौक व रस्त्यांवर आकर्षक आणि शक्तिशाली स्ट्रीटलाईट्स बसवून अंबडचे नाइट-स्कायलाइन पूर्णपणे बदलणार आहे. अंधार संपेल- सुरक्षितता वाढेल शहर नवीन रूपात नटणार महिला सुरक्षेला प्राधान्य संपूर्ण शहर हायटेक उउढत कव्हरेज माता-भगिनींच्या सुरक्षेसाठी संपूर्ण शहरात उउढत नेटवर्क उभारण्याचा निर्णय देवयानीताईंनी जाहीर केला आहे.त्यासोबतच महिलांसाठी स्वच्छ, सुरक्षित व स्वतंत्र स्वच्छतागृहे उपलब्ध केली जाणार आहेत. यामुळे शहरातील गुन्हेगारीवर मोठा आळा बसेल, असा विश्वास व्यक्त होता आहे. आबालवृद्धांसाठी आनंदाची सैर कॉंक्रीटच्या जंगलात माणुसकीची सोनेरी छटा निर्माण करण्याचा देवयानीताईंचा निर्धार उल्लेखनीय आहे. मुलांसाठी सुरक्षित व आधुनिक प्लेग्राऊंड्स ज्येष्ठ नागरिकांसाठी नाना-नानी पार्क तरुणांसाठी वॉकिंग ट्रॅक आणि ओपन जिम अंबडचा प्रत्येक नागरिक त्यात सामावलेला- हा त्यांचा दृष्टीकोनच लोकांना भुरळ घालतो आहे.रस्ते-ड्रेनेज-वाहतूक वर्षानुवर्षे रखडलेले प्रश्न आता मार्गी नियोजनबद्ध पद्धतीने शहरातील रस्ते,ड्रेनेज लाईन्स आणि वाहतूक कोंडीचे प्रश्न सोडवण्यासाठी त्या सज्ज आहेत.माझे अंबड स्वच्छ-सुंदर करण्यासाठी मी रक्ताचे पाणी करेन त्यांचे हे उद्गार मतदारांच्या काळजाला भिडले आहेत.

जनतेचा प्रचंड ओढा प्रचारसभांना विक्रमी गर्दी महिला नेतृत्व पारदर्शक कारभार आणि विकासाचे स्पष्ट ब्लूप्रिंट यामुळे देवयानीताईंच्या सभांना लोकांची अभूतपूर्व गर्दी होत आहे.ज्येष्ठ नागरिकांपासून युवकांपर्यंत सर्वच वर्गातून त्यांना मिळणारा प्रतिसाद प्रचंड आहे. अंबडच्या नशिबाची पालख पलटणार नागरिकांचा विश्वास वाढला आहे.स्वच्छ प्रतिमा, अभ्यासू वृत्ती आणि वास्तव जाणणारे नेतृत्व म्हणजे सौ. देवयानी केदार कुलकर्णी अशी चर्चा आता मतदारांमध्येच रंगत आहे.

# अंबडच्या राजकारणात भूकंप

## ४० वर्षे राष्ट्रवादीची साथ अखेर सोडली- काझी अर्शदांचा भाजपमध्ये ग्रँड प्रवेश



## भाजपचे मिशन अंबड आणखी शक्तिशाली

### अंबड मध्ये भाजपचे ताकद वाढली राजकीय वाऱ्याची दिशा बदलली आता मुकाबला अधिक रोचक

अंबड /प्रतिनिधी :-

अंबड च्या राजकीय रणांगणात आज अक्षरशः भूकंप झाला तब्बल ४० वर्षे राष्ट्रवादी कॉंग्रेसचा खांब मानले जाणारे, ज्येष्ठ नेते आणि महाराष्ट्र व्हॉलीबॉल असोसिएशनचे उपाध्यक्ष काझी अर्शद (टींरळ -ीहरव) यांनी राष्ट्रवादीला रामराम ठोकत भाजपमध्ये भव्य प्रवेश करून शहरातील राजकीय समीकरणे पूर्णपणे बदलून टाकली.दानवे-लोणीकरांच्या उपस्थितीत जंगी स्वागत अंबडमध्ये झालेला हा पक्षप्रवेश सोहळा म्हणजे भाजपचे शक्तिप्रदर्शनच या प्रसंगी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे,माजी मंत्री व आमदार बबनराव लोणीकर, आमदार नारायण कुचे, केदार दादा कुलकर्णी, या दिग्गज नेत्यांची भव्य उपस्थिती होती.मान्यवरांनी काझी अर्शद यांचे शाल,श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन अत्यंत जंगी स्वागत केले.भाजपला मिळाला तगडा चेहरा ४० वर्षांचा अनुभव भाजपच्या पारड्यात

काझी अर्शद हे अंबड शहरातील अनुभवी जमीनिवरचे आणि प्रभावी नेते म्हणून ओळखले जातात अंबडचा विकास आणि राजकारण दोन्हीत अनुभवी नेतृत्व जोडल्याने भाजपची ताकद दहापट वाढेल असे मत वरिष्ठ नेत्यांनी व्यक्त केले. ते केवळ राजकारणातच नव्हे तर क्रीडा क्षेत्रातील मान्यवर म्हणूनही आपल्या कामगिरीसाठी प्रसिद्ध आहेत.महाराष्ट्र व्हॉलीबॉल असोसिएशनचे उपाध्यक्ष म्हणून त्यांनी असंख्य खेळाडू घडवले.अशा व्यक्तिमत्त्वाचा भाजपमध्ये प्रवेश म्हणजे महायुतीसाठी मोठा लाभ मानला जात आहे. कार्यकर्त्यांचा प्रचंड उत्साह शेख शकील आणि शेख फेरोज यांच्या नेतृत्वात जोरदार स्वागत पक्षप्रवेशावेळी कार्यकर्त्यांनी घोषणांचा गडगडाट,टाळ्यांचा कडकडाट आणि उत्साहाचा जणू स्फोट केला. शेख शकील आणि शेख फेरोज यांनी काझी अर्शद यांचे खास स्वागत करत भाजपच्या मिशन अंबडला आणखी वेग देण्याचा निर्धार व्यक्त केला.राष्ट्रवादीला मोठा धक्का अंबडमध्ये समीकरणे बदलणार ४० वर्षे राष्ट्रवादीची धुरा सांभाळलेले नेते भाजपमध्ये दाखल झाल्याने राष्ट्रवादी कॉंग्रेसला मोठा धक्का बसला तर भाजपच्या मिशन अंबड'ला नवे पंख मिळाले आहेत. राजकीय जाणकारांचे एकमत काझी अर्शद यांचा प्रवेश हा अंबडमधील निवडणूक समीकरणांचा गेमचेंजर ठरणार भविष्यासाठी शुभेच्छांचा वर्षाव मान्यवरांनी काझी अर्शद यांची पुढील राजकीय वाटचाल अंबडच्या विकासासाठी मोलाची ठरेल असा विश्वास व्यक्त करत मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.



# अंबड शहरात मोकाट कुत्र्यांचा सुळसुळाट

## भिक नको पण कुत्रा आवर म्हणण्याची वेळ

अंबड (प्रतिनिधी)- शहरात मोठ्या प्रमाणावर मोकाट कुत्र्यांचा सुळसुळाट वाढला आहे. त्यामुळे नागरिकांना आपला जीव मुठीत घेऊन चालावे लागत आहे. तसेच मिक नको पण कुत्रा आवर म्हणण्याची वेळ आलेली आहे.

पालिका निवडणूकींचे पडघम वाजले आहे. नगर परिषदेमध्ये सध्या निवडणुकीचे वातावरण तापले असल्याचे चित्र दिसून येत आहे. तसेच प्रचार आणि फेऱ्यांची रणधुमाळी सुरू झाली आहे. तर दुसरीकडे शहरातील समस्यांकडे नगरपरिषदेचे दुर्लक्ष होत असल्याचे चित्रही समोर येत आहे. सध्या शहरात अनेक प्रकारच्या समस्यांना ऊत आला आहे. यापैकी एक मोठी समस्या म्हणजे मोकाट कुत्र्यांची दिवसेनदिवस वाढत असलेली संख्या होय. भीक नको पण कुत्रा आवंर असे म्हणण्याची वेळ शहरातील नागरिकांवर आलेली आहे. सध्या शहरातील विविध भागात कुत्र्यांचे साम्राज्य वाढल्याचे चित्र दिसून येत आहे. शहरातील अनेक भागात या मोकाट कुत्र्यांनी ताबा मिळवला आहे. त्यामुळे लहानथोरांना आपला जीव मुठीत घेऊन ये-जा करावी लागत आहे. या मोकाट कुत्र्यांमूळे अंबडकरांवर कधी कोणता प्रसंग ओढवेल काही सांगता येत नाही. नुकतेच शहरातील एका लहान मूलीवर या मोकाट कुत्र्यांनी हल्ला केल्याची घटना अजून ताजी आहे. या मोकाट कुत्र्यांनी केवळ गल्ली बोळातच धुमाकूळ घातला आहे असे नाही तर शहरातील मुख्य रस्त्यावर देखील त्यांनी ताबा मिळवला आहे. त्यामुळे वाहनधारकांना ही मोठी कसरत करावी लागत आहे. ही कुत्री रोडवर अचानक आडवी आल्याने मोठ्या प्रमाणावर अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. विकास वगैरे काही नको अगोदर शहरातील मोकाट जनावरे व मोकाट कुत्री आवरा असे म्हणण्याची वेळ शहरवासीयांवर आली आहे. सध्या शाळाही सूरू आहेत. त्यामुळे या कुत्र्यांच्या भीती पोटी शाळकरी मुलांना वाटेतूनच मागे फिरण्याची वेळ येते. तसेच हातातील सामानाच्या पिशव्या या कुत्र्यांनी हिसकावून घेण्याच्याही अनेक घटना घडल्या आहेत. शहरातील पठाण मोहल्ला, कूरैशी मोहल्ला, कावंदी गल्ली, नायकवाडी मोहल्ला, मटन मार्केट, जूना मोंढा, आंबेडकर पुतळा तसेच जालना बीड रोडवर कुत्र्यांचे कळपच्या कळप दिसून येत आहेत.

या मोकाट कुत्र्यांचा ताबडतोब बंदोबस्त करण्यात यावा अशी मागणी नागरिकांकडून मोठ्या प्रमाणावर केली जात आहे.

## संपादकीय

# तगडा नायक , उमदा माणूस

पंजाबच्या मातीतून आकाराला आलेलं शिल्प म्हणजे धर्मेंद्र. बलदंड शरीर, तितकाच सोज्वळ चेहरा आणि दमदार अभिनय. अलीकडच्या काळात कारकिर्दीनंतरचा निवांतपणा अनुभवणारा हा तगडा नायक आणि उमदा माणूस अखेर अनंताच्या प्रवासाला गेला. चार दशकं सिनेचाहत्यांच्या मनावर अधिराज्य करणाऱ्या या 'ही मॅन'च्या आठवणी...

१९६०च्या दशकात दोन तरुण उमदे, ताजेतवाने कलाकार एकदमरूपेरी पडद्यावर झळकले. चित्रपट होता 'शादी'. साधा कौटुंबिक चित्रपट. पुढे 'भारत' बनून नायक निर्माता अन् दिग्दर्शक म्हणून लोकप्रिय ठरलेला मनोजकुमार अन् नंतर तगडा हिरो म्हणून गाजलेला धर्मेंद्र हे दोघे त्यावेळी अगदीच नवशिके होते. 'पंजाब दा पुत्तर' आणि 'गरम धरम' म्हणून फिल्मी मॅगझिन्सनी ज्याचा खूप उदोउदो केला तो धर्मेंद्र,आधी अगदीच साधा, लाजरा बुजरा अन् शांत होता.'अंडर प्ले' करण्याकडे त्याचा कल होता. १९६२ मध्ये आलेल्या 'अनपढ' या मोहन सैगल दिग्दर्शित चित्रपटात माला सिन्हाला जबरदस्त भूमिका मिळाली. ती अशिक्षित आणि तिचा नवरा धर्मेंद्र चक्क प्रोफेसर. सुटाबुटातला हा प्राध्यापक त्याने समरसून रंगवला. त्याची भूमिका चित्रपटाच्या आधीच संपते. पण तरी तो लक्षात राहून गेला. 'आप की नजरों ने समझा' या गाण्याच्या वेळी धर्मेंद्र-माला सिन्हा ही जोडी पडद्यावर झकास दिसली. 'अनपढ' दणकून चालला आणि त्याचा फायदा दोघांनाही मिळाला. 'आप की परछाईयाँ' आणि 'देवर' या चित्रपटांमधून धर्मेंद्र आणखी परिपक्व होत गेला. मदनमोहन (अनपढ, आप की परछाईयाँ) आणि रोशन (देवर) यांची गाणी तेव्हा खूप श्रवणीय ठरली.

धर्मेंद्र प्रेक्षकांच्या खरा लक्षात आला तो 'फूल और पत्थर' या भव्य रंगीत चित्रपटामुळे. इथे मीनाकुमारी त्याची नायिका होती. ती विधवा आणि असहाय्य तर हा गुन्हेगारी जगतात बुडालेला शराबी. तिची शांत सोज्वळ प्रतिमा तर हा आक्रमक दणकट व्यक्तिमत्वाचा पत्थरदिल इन्सान, पण शांती (मीनाकुमारी) आपल्या व्यक्तिमत्वाने शाकाचा (धर्मेंद्र) कायापालट घडवते. दोन्ही व्यक्तिमत्त्वांमधला विरोधाभास मोठा मनोज्ञ ठरला.

## टी.सी. हरवली

बजरंग गोविंदराव केरले,मु. इब्राहिमपूर,पोस्ट खानापूर, ता. देगलूर, जिल्हा नांदेड यांची इयत्ता दहावीची टी.सी. देगलूर-नांदेड प्रवास दरम्यान हरवली आहे. कोणाला मिळाल्यास कृपया संपर्क करा : ९३५९५७७९१७

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१३६४ दि.१४.११.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्री साईनाथ साहेबराव भिंगारे, रा.नागोण्याचीवाडी ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | अभिषेक साईनाथ भिंगारे | मुलगा | २८.०८.२००७ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

पान १ वरून...

**कागदे साहेब, ....**

मुलीला रखेल म्हणालात, ठेवलेली म्हणालात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या घटनेप्रमाणे कायद्यात राहून माझ्या मुलीने शेख मुजीब यांच्याशी सनदशीर पध्दतीने विवाह केलेला आहे जो मला मान्य आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जाती अंताचा लढा उभा केला आणि कागदे साहेब तुम्ही काय म्हणातायत ? माझ्या मुलीने बाबासाहेबांना अभिप्रेत असलेल्या जातधर्माच्या भिंती ओलांडून विवाह केला जो तुम्हाला मान्य नाही का ? कसले आंबेडकरवादी आहात तुम्ही ? हा माझा सवाल आहे. कागदे साहेब तुम्हाला आज एका दलित महिलेला राजकारणात आलेलं पाहून तुमच्या पोटात दुखतंय, माझा बाप आणि नवरा दोघेही बौध्दवासी आहेत अशा भिमाच्या लेकीवर एवढ्या खालच्या पातळीवर जाऊन तुम्ही आरोप करणार आहात का ?

हो मुजीब शेख माझा जावई आहे, मी त्याची सासू आहे. लपून छपून नाही तर बाबासाहेबांना स्मरून बाबासाहेबांच्या कायद्याने हे नाते आहे. आज माझ्या जावयाचे बांधव एका भिमाच्या लेकीला निवडून देण्यासाठी जीवाचे रान करत आहेत. मी त्यांचे आभारी आहे, मी निवडून आल्यानंतर कागदे साहेब मीच सही करणारेय, मीच खुर्चीत बसणारेय, माझ्या खुर्चीच्या मागे आमच्या बापाचा बाबासाहेबांचा फोटो लागणार आहे. त्यामुळे आंबेडकरवादाची ढाल करून स्वतःचं राजकारण पुढे करू नये. स्वतःचा दडलेला अर्थ आता समाजाच्या लक्षात आलाय.

आणखी एक तुमच्यावर कुठला अन्याय झालाय. आरक्षण महिलेला आहे. तुम्ही कुठे उभे होतात ? तुमचा उमेदवार कोण होता ? हे एकदा समाजाला सांगा. केवळ अन्याय म्हणून, छाती बडवून हे पटणारे नाही. एका महिलेवर तिच्या चारित्र्यावर, तिच्या कुटूंबावर आणि तिच्या अनुवंषावर संशय घेणं हे अत्यंत किळसवाणे, क्लेषदायक आणि दुर्दैवी आणि आंबेडकरी चळवळीला न शोभणारे आहे असे प्रेमलताताई पारवे यानी पत्रकारपरिषदेत म्हटले आहे.

**नगरपालिका निवडणुकीची....**

मला तरी अशी अपेक्षा आहे की, या सर्व निवडणुका निर्विघ्नपणे पार पडतील. अर्थातच हा सर्व निर्णय सर्वोच्च न्यायालयाला घ्यायचा आहे, त्यामुळे यावर आज जास्त बोलणे उचित नाही, असेही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

उद्धव ठाकरेंच्या सरकारमुळे आरक्षण गेलं - फडणवीस

पान १ वरून...

निवडणुका संपूर्ण ओबीसी आरक्षणासहितच झाल्या पाहिजे, अशी भूमिका राज्य सरकारची आहे. मात्र, राज्यात उद्धव ठाकरेंचे सरकार होतं, त्यावेळी त्यांनी तो निर्णय घेतला होता. त्यामुळे जवळपास सर्वच ठिकाणी ओबीसी आरक्षण संपलं होतं. त्यानंतर आम्ही कोर्टात गेलो आणि कोर्टाला सांगितलं की, हे संपूर्णपणे आरक्षण मिळाल्यावरच निवडणुका घेतल्या पाहिजेत. मात्र, त्यानंतर काही लोक कंटेम्पटमध्ये कोर्टात गेले आणि त्यांनी कोर्टात एक जजमेंटचा दाखला दिला, त्यानंतर हे सगळं सुरू झालं, अशी माहिती देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

सर्वोच्च न्यायालयात कशामुळे याचिका

सर्वोच्च न्यायालयातील स्थानिक स्वराज्य संस्थांमधील ओबीसी आरक्षणासंदर्भातील पुढील सुनावणी शुक्रवारी २८ नोव्हेंबर होणार आहे. त्यामुळे सुनावणी लांबल्याने राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांवर टांगती तलवार कायम आहे. दरम्यान, विकास गवळी यांनी दाखल केलेल्या याचिकेत असा दावा आहे की, काही स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आरक्षणाचा अनुपात घटनात्मक ५० टक्के मर्यादेपेक्षा जास्त ठेवण्यात आला आहे, जे कायद्याच्या विरोधात आहे. मात्र असा की, बांठिया आयोगाच्या अहवालाचा संदर्भ घेत आरक्षणाची रचना योग्य पद्धतीने करण्यात आली आहे, असा दावा राज्य सरकारकडून करण्यात आला आहे. दरम्यान, राज्यातील ४० नगरपरिषदांमध्ये आरक्षणाच्या ५० टक्क्यांच्या मर्यादेचे उल्लंघन झाले, याची माहितीही समोर आली आहे.

**भाजपाच्या उमेदवारांना ...**

राजपूत, राहुल गुरखुदे यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. त्यानंतर शहरातील श्री कृष्ण मंदिर व खडकपुरा येथील श्री खंडोबा मंदिरात डॉ.घोमरे (घुंबरे) व पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी मनोभावे आरती केली. कार्यक्रमास प्रभाग क्रमांक २ चे उमेदवार शुभम दिलीप धूत, सावित्री नितीन साखरे, प्रभाग क्रमांक १९ चे उमेदवार परसराम जाधव, मुक्ता बाबूलाल ढोरमारे, प्रभाग क्रमांक ०५ च्या उमेदवार मीना रणजीतसिंह चौहान, प्रकाश कानगावकर यांच्यासह भाजप जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, शांतीनाथ डोरले आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, प्रभाग क्रमांक ३ मधील रामतीर्थ व मंत्री कन्स्ट्रक्शन परिसरात आयोजित बैठकीत डॉ.ज्योती घोमरे (घुंबरे), नगरसेवक पदाचे उमेदवार अमृत सारडा, अश्विनी गोरख मोमीन यांनी नागरिकांशी संवाद साधला. या बैठकीला उत्साही प्रतिसाद मिळाला असून सर्व भाजप उमेदवारांना प्रचंड बहुमताने निवडून देण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

# ०७ फेब्रुवारी रोजी ११ जोडप्यांचा सामूहिक विवाह सोहळा

## ग्लोबल विकास ट्रस्टच्या वतीने आयोजन; १५ जानेवारी नाव नोंदणीची अंतिम तारीख

परळी वैजनाथ (प्रतिनिधी)

ग्लोबल विकास ट्रस्ट या सामाजिक संस्थेच्या वतीने सलग दुसऱ्या वर्षीच्या सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मयंक गांधी यांनी याबाबतची सविस्तर घोषणा केली आहे. शनिवार, ०७ फेब्रुवारी २०२६ रोजी हे सामूहिक विवाह संपन्न होणार आहेत, ज्यामध्ये आत्महत्याग्रस्त, अपंग किंवा विकलांग पालक असलेले तसेच आर्थिक दुर्बल कुटुंबातील ११ जोडप्यांना प्राधान्य देण्यात येणार आहे. त्यासाठीची नोंदणी १५ जानेवारी २०२६ पर्यन्त कृषीकुल शेतकरी प्रशिक्षण केंद्र सिरसाळा येथे प्रत्यक्ष भेट देऊन करता येणार असल्याचेही सांगण्यात आले आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, ग्लोबल विकास ट्रस्ट या सामाजिक संस्थेच्या वतीने मागील वर्षीपासून सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात येते. ज्यामध्ये गरीब आणि गरजू शेतकरी कुटुंबातील जोडप्यांचे विवाह केले जातात. मे २०२५ मध्ये संपन्न झालेल्या विवाह सोहळ्यात सहभागी जोडप्यांना हुंडा न घेण्याची आणि न देण्याची शपथ देण्यात आली होती. त्याचबरोबर सर्व सहभागी नव दांपत्यांना मणी मंगळसूत्रा बरोबरच आवश्यक ते सर्व संसरोपयोगी साहित्य भेट देण्यात आले होते. याचप्रमाणे यंदाचाही आदर्श सामुदायिक विवाह सोहळा आयोजित करण्यात आला आहे. जलनायक मयंक गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली ग्लोबल विकास ट्रस्ट ही सामाजिक संस्था विविध क्षेत्रात कार्यरत आहे. फळबाग लागवडीतून शेतकऱ्यांचे उत्पन्न प्रती एकरी एक लाख करण्याचा संस्थेचा मुख्य संकल्प आहे. त्याचबरोबर गुणवरा आणि पापनाशी नदीवर जलसंधारणाची कामे मोठ्या प्रमाणावर संस्थेने केली आहेत. यंदाच्या वर्षी झालेल्या अतिवृष्टीने हजारो शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले होते. पिकांबरोबरच शेतातील मातीही वाहून गेली होती. त्यांच्या जगण्याचा मोठा प्रश्न उभा राहिल्याचे पाहून ग्लोबल विकास ट्रस्टच्या वतीने त्यांना मदतीचा हात देण्यात आला. ६ हजार पेक्षा जास्त शेतकरी कुटुंबांना २२ जीवनावश्यक वस्तूंचा समावेश असलेल्या किराणा किटचे वितरण करण्यात आल्याने त्यांची दिवाळी गोड होऊ शकली. त्याचबरोबर शेतकरी संवाद मेळावा घेऊन देशाचे कृषीमंत्री श्री. शिवराज सिंह चौहान यांना निमंत्रित करण्यात आले व त्यांना मराठवाड्यातील शेतकऱ्यांचे महत्वपूर्ण प्रश्न सोडवण्याची विनंती करण्यात आली. त्याचेच परिणाम पीक विमा योजनेत बदल झाल्याचे आपल्याला दिसून आले.

१५ नोव्हेंबर पर्यंत करता येणार



नाव नोंदणी

जलनायक मयंक गांधी संस्थापक अध्यक्ष असलेल्या ग्लोबल विकास ट्रस्टच्या वतीने यंदा सलग दुसऱ्या वर्षी सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. ०७ फेब्रुवारी २०२६ रोजी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून १५ जानेवारी २०२६ पर्यन्त पात्र कुटुंबांना नाव नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. आत्महत्याग्रस्त, अपंग किंवा विकलांग पालक असलेले तसेच आर्थिक दुर्बल कुटुंबातील जोडप्यांना प्राधान्य देण्यात येणार आहे. कृषीकुल शेतकरी प्रशिक्षण केंद्र सिरसाळा येथे प्रत्यक्ष भेट देऊन नाव नोंदणी करता येणार असून, अधिक माहितीसाठी ९५५८४८८६८६ या क्रमांकावर संपर्क करता येईल असे संयोजकांच्या वतीने सांगण्यात आले आहे.

# ना. पंकजाताई मुंडेंच्या सभेने धारूर 'कमळमय'

## 'निर्मळ' कारभारासाठी भाजपला साथ द्या - ना. पंकजाताई मुंडेंनी धारूरच्या विकासाचे मांडले व्हिजन

धारूर । प्रतिनिधी

सुशासन आणि पारदर्शक कारभार हा भाजपचा मुलमंत्र आहे. समाजातील सर्व जाती धर्माच्या विकासाला प्राधान्य देऊन धारूरच्या 'निर्मळ' कारभारासाठी भारतीय जनता पक्षाला साथ द्या. तुमचा विश्वास सार्थ ठरवून धारूरला प्रगतीपथावर नेवून ठेवू. राज्याची मंत्री म्हणून नाहीतर धारूरची नगरसेवक बनून मी स्वतः शहराच्या विकासाकडे लक्ष देईल असा विश्वास राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी आज मतदारांशी बोलताना दिला. आजच्या या सभेने शहर कमळमय झाल्याचे दिसून आले.

धारूर नगर परिषद निवडणुकीतील भारतीय जनता पक्षाचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार रामचंद्र अंबादासराव निर्मळ व नगरसेवक पदाच्या उमेदवाराच्या प्रचारानिमित्त आयोजित जाहीर सभेत ना. पंकजाताई मुंडे बोलत होत्या. माजी नगराध्यक्ष डॉ. स्वरूपसिंह हजारी, माधवराव निर्मळ, उदयसिंह दिख्खत, राम कुलकर्णी, संजय आंधळे, संदीप काचुगंडे यांच्यासह सर्व उमेदवार आणि




पदाधिकारी उपस्थित व्यासपीठावर होते.इथल्या सुज्ञ नागरिकांनी नेहमीच आम्हाला साथ दिली आहे. नगर परिषदेच्या माध्यमातून आम्ही इथे प्रामाणिकपणे काम केले आहे. माजी नगराध्यक्ष डॉ. हजारी यांनी पारदर्शक आणि स्वच्छ कारभार करून शहराचा लौकिक वाढवला. त्यांच्या निर्णयात कधीही हस्तक्षेप केला नाही.जनतेच्या प्रत्येक कामासाठी आम्ही सर्वतोपरी मदत केली आहे. धारूरच्या इतिहासात निर्मळ कुटुंबाचे मोठे योगदान आहे. शहराच्या निर्मळ कारभारासाठी भाजपला साथ द्या असे आवाहन ना. पंकजाताई मुंडे यांनी मतदारांना केले.

धारूरच्या विकासाचे मांडले व्हिजन

मतदारांशी संवाद साधताना ना. पंकजाताई मुंडे यांनी शहराच्या विकासाचे व्हिजनच मतदारांसमोर मांडले. धारूर नगर परिषद भाजपच्या ताब्यात द्या. दर तीन महिन्याला आपण स्वतः इथे येऊन कामाचा आढावा घेऊ असं त्या म्हणाल्या. मी राज्याची मंत्री असले तरी नगरसेवक बनून शहराच्या विकासात लक्ष घालणार असल्याचे सांगत त्यांनी धारूरकरांची मन जिंकली. 'शहर स्वच्छ आणि सुंदर करण्यासाठी आम्ही विविध योजना राबविणार आहोत, शहरात वृक्ष लागवड करण्यात येईल, पाणी पुरवठ्याचे नियोजन करून शहराला सुरळीत पाणी मिळेल यासाठी योजना आणायची आहे, कचऱ्यावर प्रक्रिया करणारा प्रकल्प राबवू. महिला बचत गटांना सशक्त करण्यासाठी उपक्रम राबवण्यात येतील. तसेच नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी ग्रामीण रुग्णालय, शाळा आणि स्मशानभूमीकडे जाणाऱ्या रस्ताचे कामे करण्यासह नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी शहरात सिसिटीव्ही कॅमरे बसवण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. याप्रसंगी सभेस उपस्थित मतदारांनी त्यांनी मांडलेले विकासाचे व्हिजन ऐकून समाधान व्यक्त केले. धारूरला विकासाची नवी दिशा देणारी पंकजाताईंची दूरदृष्टी मतदारांवर प्रभावी ठरल्याचे चित्र याप्रसंगी दिसत होते.

मतदारांच्या घेतल्या गाठीभेटी

सभा संपल्यानंतर ना.पंकजाताई मुंडे यांनी धारूर शहरातील मतदारांच्या गाठीभेटी घेऊन त्यांच्याशी संवाद साधला. शहरातील उत्तमराव तोषणीवाल, सादेक इनामदार, डॉ राम शिंगारे, दत्ता धोत्रे, मोहन भोसले, सुमंतराव डुबे आदीच्या घरी जाऊन भाजपला साथ देण्याचे आवाहन त्यांनी केले

# आष्टी येथील माऊली मंदिर येथे इंग्रजी भाषेतून वारकरी शिक्षण संस्था सुरु करणार

## वारकरी संप्रदायाची पताका परदेशात पोहोचावी हाच उद्देश - मा.आ.भीमराव धोंडे यांची घोषणा

आष्टी (प्रतिनिधी) जून २०२६ महिन्यामध्ये आष्टी येथील माऊली मंदिर याठिकाणी वारकरी शिक्षण संस्था सुरू करणार असून त्यामध्ये विशेषतः इंग्रजी भाषेतून शिक्षण मिळावे या अनुषंगाने इंग्लिश वारकरी संस्था आणि मराठी वारकरी संस्था अशा सुरू करण्याची घोषणा आष्टी, पाटोदा, शिरूरचे माजी आ. भीमराव धोंडे यांनी केली आहे.

आष्टी तालुक्यातील टाकळी अमिया येथे बाळूमामाच्या मंदिरामध्ये अखंड हरिनाम सप्ताहाच्या सांगता प्रसंगी माजी आ. भीमराव धोंडे बोलत होते. इंग्लिश भाषेतील वारकरी संस्था आणि मराठी भाषेतील वारकरी संस्था अशा दोन्ही सुरू करून आपण वारकरी संप्रदायातील संस्कार आणि ज्ञानाची ध्वज आणि पताका जगभर नेणार आहोत. माजी आमदार भीमराव धोंडे यांनी ही घोषणा केली आणि उपस्थित हजारो भाविक भक्तांनी त्यांच्या घोषणेचे प्रचंड टाळ्या वाजवून स्वागत केले. यासंदर्भात पुढे बोलताना माजी आ. भीमराव धोंडे म्हणाले की, इंग्लिश वारकरी संस्था करण्याचा उद्देश असा आहे की, जर महाराष्ट्राच्या बाहेर आणि देशाच्याही बाहेर आपल्या वारकरी संप्रदायाचे संस्कार,अभंग आणि साहित्य पोहोचवायचे असेल तर



इंग्रजी भाषेतूनसुद्धा कीर्तनकार तयार झाले पाहिजेत आणि या कीर्तनातून आपल्या महाराष्ट्र भूमीतील संतांचे विचार देशभर आणि जगभर पोहोचले पाहिजेत असे सांगीतले.यावेळी माजी आमदार साहेबराव दरेकर, ह. भ. प. दादा महाराज चांगुणे, युवा नेते धैर्यशील थोरवे, सरपंच सावता ससाणे, अण्णासाहेब चौधरी, सुनील नाथ, अशोक ढवन, जगन्नाथ ढोबळे, सदा पाटील दिंडे, चेअरमन दादासाहेब हजारे, दादासाहेब झांजे, मोहन चोपडे आदि उपस्थित होते.

माजी आ.भीमराव धोंडे यांच्या घोषणेचे स्वागत

आज आष्टी तालुक्यातील टाकळी अमिया येथे संत बाळूमामांच्या मंदिरामध्ये अखंड हरिनाम सप्ताहाच्या सांगता प्रसंगी माजी आ. भीमराव धोंडे यांनी आपल्या मनोगत प्रसंगी ही घोषणा केली. इंग्रजी आणि मराठी भाषेतून संत साहित्य जगभर पोहोचण्याचा या संकल्पनेचे उपस्थित तालुक्यातील भाविक भक्तांनी स्वागत करून धोंडे यांच्या संकल्पनेला टाळ्यांच्या गजरात दाद दिली.

# शिर्डी नगरपरिषद निवडणूक २०२५ : प्रभाग १० मध्ये नितीन पाराजी कोते यांच्या उमेदवारीने चुरस वाढली; 'विकास आणि विश्वास' ठरणार निवडणुकीचा केंद्रबिंदू

## केवळ आश्वासन नाही, तर कृतीतून विकास साधणार! - नितीन कोते यांचा निर्धार

शिर्डी ।प्रतिनिधी

शिर्डी नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या रणधुमाळीला जोरदार सुरुवात झाली आहे. प्रभाग क्रमांक १० मधून श्री. नितीन पाराजी कोते यांची उमेदवारी जाहीर होताच प्रभागातील राजकीय समीकरणे वेगाने बदलली आहेत. जनसामान्यांशी असलेली नाळ आणि कामाचा धडाका यामुळे निवडणुकीत वेगळीच रंगत निर्माण झाली आहे. उमेदवारी जाहीर होताच प्रभागातील तरुण, ज्येष्ठ नागरिक आणि महिला भगिनींकडून त्यांना मिळणारा प्रतिसाद लक्षणीय ठरत आहे.

जनसंपर्कातून निर्माण झालेलं नेतृत्व,राजकारणात केवळ पद मिळवण्यासाठी नव्हे, तर समाजाचे प्रश्न सोडवण्यासाठी धडपडणारा एक हाकेला धावून जाणारा कार्यकर्ता अशी नितीन कोते यांची ओळख आहे. त्यांचा हा जनसंपर्क एका दिवसाचा नसून, सुख-दुःखात नागरिकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याच्या त्यांच्या वृत्तीतून तो विकसित झाला आहे. बडेजाव न करता शांतपणे आणि संयमाने काम करण्याच्या त्यांच्या पद्धतीमुळे सामान्य मतदार त्यांच्याकडे आशेने पाहत आहेत.



प्रभाग १० आणि विकासाचे व्हिजन,

शिर्डी शहराचा विकास होत असताना प्रभाग क्र. १० मधील नागरिकांच्या अपेक्षाही वाढल्या आहेत. पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन, अंतर्गत रस्ते आणि स्वच्छतेचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी नितीन कोते यांनी पुढाकार घेतला आहे. समस्या मांडणारे अनेक असतात, पण त्या सोडवणारा प्रतिनिधी हवा, ही मतदारांची भावना ओळखून नितीन कोते यांनी विकासाचा आराखडा तयार केला आहे. त्यांच्या उमेदवारीमुळे प्रभागाच्या विकासाला नवी गती मिळेल, असा विश्वास स्थानिक व्यक्त करत आहेत.

युवा शक्ती आणि ज्येष्ठांचा आशीर्वाद,

नितीन कोते यांचा तरुणांशी असलेला दांडगा संपर्क आणि ज्येष्ठांचा मिळणारा आशीर्वाद ही त्यांची जमेची बाजू आहे. प्रभागातील प्रत्येक घटकाला सोबत घेऊन जाण्याची त्यांची हातोटी त्यांना इतरांपेक्षा वेगळे ठरवते.

विखे पाटील गटाचे भक्कम पाठबळ,

विशेष म्हणजे, राज्याचे महसूल मंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील आणि माजी खासदार डॉ. सुजयदादा विखे पाटील यांचा सक्रिय आणि भक्कम पाठिंबा नितीन कोते यांना लाभला आहे. वरिष्ठ नेतृत्वाचे मार्गदर्शन आणि नितीन कोते यांची जिद्द यांचा मेळ जुळून आल्याने त्यांची बाजू भक्कम मानली जात आहे.

'लोकसेवक' म्हणून सदैव तत्पर!

निवडणुकीतील आपल्या भूमिकेविषयी बोलताना नितीन कोते यांनी आपला संकल्प स्पष्ट केला. ते म्हणाले, प्रभाग क्र. १० मधील प्रत्येक नागरिक हा माझ्यासाठी महत्त्वाचा आहे. पिण्याचे पाणी, उत्तम रस्ते आणि आरोग्यदायी परिसर मिळवून देणे हे माझे कर्तव्य आहे. मी केवळ निवडणूक लढवत नाही, तर प्रभागाचा कायापालट करण्यासाठी मैदानात उतरलो आहे. नामदार राधाकृष्ण विखे पाटील साहेबांच्या मार्गदर्शनाखाली प्रभागाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी आणि नागरिकांचा विश्वास सार्थ ठरवण्यासाठी मी कटिबद्ध आहे.

# काँग्रेस वंचित बहुजन आघाडीच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार

## मैनुमा बेगम सय्यद हनीफ यांच्या प्रचार फेरीस प्रभाग क्रमांक १ व २ मध्ये प्रचंड प्रतिसाद



परळी ।प्रतिनिधी

परळी नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ काँग्रेस ,वंचित बहुजन आघाडीच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार मैनुमा बेगम सय्यद हनीफ उर्फ बहादूर भाई तसेच प्रभाग क्रमांक १ व २ मधील काँग्रेसचे उमेदवार गुलाब पठाण तसेच सय्यद हनीफ उर्फ बहादूर भाई यांच्या प्रचारार्थ आज भव्य प्रचार फेरी काढण्यात आली. या प्रचार फेरीस मतदारांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला असून काँग्रेस व वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारालाच मतदान करण्याचे वचन मतदारांनी यावेळी दिले.

आज दिनांक २४ नोव्हेंबर रोजी सकाळी प्रभाग क्रमांक १ व २ या प्रभागातील काँग्रेस ,वंचित बहुजन आघाडीचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार तसेच नगरसेवक पदाचे उमेदवार यांच्या प्रचारासाठी भव्य प्रचार फेरी काढण्यात आली. यावेळी नगराध्यक्ष पदाचे उमेदवार मैनुमा बेगम सय्यद हनीफ उर्फ बहादूर भाई, प्रभाग क्रमांक एक मधील काँग्रेसचे अधिकृत उमेदवार गुलाब पठाण यांनी मतदारांच्या गाठीभेटी घेऊन मताचा आशीर्वाद मागितला व काँग्रेस वंचित बहुजन आघाडीला विजय करण्याचे आवाहन केले.

या प्रचार फेरीत इस्माईल पठाण ,इब्राहिम शेख ,सय्यद शेख ,अफजल पठाण, सोहेल शेख, शेख खलील ,सय्यद इब्राहिम, इब्राहिम चाऊस, रशीद पठाण, खालीद बागवान, आयेशाबी,शेरबानो,सुषमाताई यांच्यासह पुरुष महिला कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# मतदारांनी भुरळ घालणारे आणि खरे मुद्दे ओळखावेत! -प्राचार्य डॉ. भारत कऱ्हाड

महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा रंग चढू लागला की सर्वप्रथम स्थानिक प्रश्नांची भाषा बदलू लागते. मतदारांचे दैनंदिन जीवन, त्यांचं रोजचं जगणं आणि त्यांच्या परिसराचा विकास - या गोष्टींवरच सर्व राजकीय पक्षांची रणनीती उभी असते. शहर असो वा गाव, मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी नेते सर्वात आधी जे मुद्दे पुढे करतात, ते हेच. कारण मतदार फक्त मोठ्या भाषणांनी प्रभावित होत नाही, तर त्याला हवे असते आपल्या घराच्या आसपासचे बदल, त्याच्या समस्यांवर थेट उपाय. म्हणूनच निवडणुकीत नेते सर्वप्रथम रस्ते, पाणी, गटार, कचरा यांसारख्या मूलभूत सुविधांवर जोर देतात. रस्ता करतो, २४ तास पाणी आणतो, कचरा व्यवस्थापन सुधारतो, अशा आश्वासनांनीच प्रचाराची सुरुवात होते. शहरांमध्ये स्मार्ट सिटी अंतर्गत प्रलंबित असणारी कामे, गटार प्रकल्प आणि सुविधा केंद्रे तर गावांमध्ये विहिरी, पाणी योजना, दिवाबत्ती आणि पाणीटंचाई निवारण या गोष्टी मतदारांना आकर्षित करण्यासाठी प्रमुख ठरतात.

निवडणुकीचा आणखी एक मोठा आधार म्हणजे स्थानिक रोजगार. बेरोजगारी ही शहर आणि गाव दोन्हीकडे सर्वसाधारण समस्या बनली आहे. त्यामुळे नेते छोटे उद्योग, महिला बचतगट, बाजारपेठेचा विस्तार, स्थानिक उद्योजकता, रोजगार केंद्रे आणि औद्योगिक क्लस्टर यांची चर्चा वाढवतात. युवकांना रोजगाराच्या संधी मिळतील हा मुद्दा कुठल्याही पक्षासाठी मतदारांना आकर्षित करण्याचा सर्वात प्रभावी मार्ग आहे. कोकण, विदर्भ आणि मराठवाड्यात ग्रामीण रोजगार, तर मुंबई-पुण्यात आयटी सेवा, स्टार्टअप आणि कौशल्य प्रशिक्षण केंद्रांची घोषणा हा प्रचाराचा महत्त्वाचा भाग आहे.

शहरांमध्ये घरकुल योजना हे नेहमीच सर्वाधिक मत मिळवणारे आश्वासन असते. प्रधानमंत्री आवास योजना, झोपडपट्टी पुनर्वसन, चाळ पुनर्विकास किंवा कमी किंमतीत घरे देण्याच्या वचनांमुळे मोठा मतदार वर्ग सहज हलतो. अनेक भागात घर मिळणे हे कुटुंबासाठी आयुष्य बदलणारे ठरते, त्यामुळे हा मुद्दा नेहमीच प्रचाराच्या केंद्रस्थानी असतो. महापालिका निवडणुकांमध्ये तर घरकुल मिळणार का नाही? हाच सर्वात मोठा निवडणूक मुद्दा ठरतो.

महिला मतदारांवर आज सर्व पक्षांनी विशेष लक्ष केंद्रित केले आहे. महिला बचतगटांसाठी कर्ज, प्रशिक्षण, आर्थिक मदत, महापालिकेच्या महिला बाजारपेठा, सुरक्षितता, सीसीटीव्ही, सार्वजनिक शौचालये, आरोग्य केंद्रे यांसारख्या मुद्द्यांचा प्रचारात मोठ्या प्रमाणात वापर होतो. महिला मतदार अनेक ठिकाणी निर्णायक भूमिका बजावतात, त्यामुळे महिला कल्याण हा मुद्दा सर्वच पक्षांसाठी महत्त्वाचा रणनीती बिंदू आहे.

युवकांसाठी मात्र वेगळी भाषा आणि वेगळा स्टाईल वापरण्यात येतो. खेळाची मैदाने, व्यायामशाळा, वाय-फाय स्पॉट, डिजिटल सुविधा, स्टार्टअप हब, करिअर मार्गदर्शन केंद्र, म्युजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रम केंद्र यांसारख्या वचनांनी युवा मतदारांना अपील केले जाते. यासोबतच व्यसनमुक्ती, नशाविरोधी मोहीम, सुरक्षितता आणि सीसीटीव्ही या मुद्द्यांनाही तरुणाई चांगला प्रतिसाद देते.

निवडणुकांमध्ये सुरक्षिततेचा मुद्दा विशेषतः शहरी भागात जोरात मांडला जातो. वाहतूक व्यवस्थापन, अवैध धंदे बंद करणे, गुन्हेगारीवर नियंत्रण, पोलिस-महापालिका समन्वय, रस्ते प्रकाशयोजना आणि सीसीटीव्ही नेटवर्क वाढवणे यांचा प्रचारात वापर केला जातो. मुंबई, पुणे, नागपूर, ठाणे यांसारख्या महानगरात हा मुद्दा मतदानावर थेट प्रभाव टाकतो.विकासकामांशी निगडित आणखी एक मोठा मुद्दा म्हणजे परवानग्या. बांधकाम परवानग्या, नकाशे मंजुरी, शहर विकास आराखडे, व्यावसायिक परवानग्या, मार्केटची जागा, हॉकर्स पॉलिसी हे सर्वच मुद्दे व्यापारी, बांधकाम व्यावसायिक, नागरिक आणि स्थानिक उद्योजक यांना प्रभावित करतात. शहरांच्या महापालिकांमध्ये तर हा मुद्दा फारच वजनदार ठरतो.

वीजबिल, पाणीबिल सवलत, आरोग्य सेवा, महापालिका रुग्णालयांचे आधुनिकीकरण, स्वच्छता- हे सगळे मुद्दे प्रचारात तत्काल परिणाम देणारे मानले जातात. महापालिकांच्या आरोग्य सेवांचा दर्जा वाढवू, दवाखाने सुधारू, स्वच्छता व्यवस्था नविकरण करू, असे वादे सामान्य मतदारांना लगेच भावतात.

आणि शेवटी, प्रादेशिक ओळख किंवा भावनिक मुद्दे. हेच मुद्दे प्रत्यक्षात मतदारांवर सर्वाधिक प्रभाव पाडतात. शहरामध्ये मराठी माणूस, स्थानिक विरुद्ध बाहेरचे, पारंपरिक उत्सव, देवस्थान विकास, स्थानिक नेते-स्थानिक प्रश्न यांची भाषा प्रचार वाढता वाढता तीव्र होते. गावांमध्ये तर वाड्या-वस्त्यांचा सांस्कृतिक अभिमान, जातीय समीकरणे, स्थानिक धर्मादाय कामे वगैरे मुद्दे प्रचंड प्रभावी असतात.या सर्व मुद्द्यांच्या मिश्रणातूनच महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका रंगतात.



## परळीच्या सर्वांगीण विकासासाठी काँग्रेस-वंचित बहुजन आघाडीलाच मतदान करा - बहादूर भाई

परळी ।प्रतिनिधी

परळी वैजनाथ हे भारतातील प्रसिद्ध ऐतिहासिक व धार्मिक स्थळ असून परळी शहराचा सर्वांगीण विकास करायचा असेल आणि बेलगाम व अनागोंदी कारभार करणाऱ्या सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेस व भाजपाला रोखायचे असेल तर मतदारांनी काँग्रेस - वंचित बहुजन आघाडीच्या नगराध्यक्ष पदाचे उमेदवार मैनुमा बेगम सय्यद हनीफ उर्फ बहादूर भाई तसेच नगरसेवक पदाचे सर्व उमेदवार यांना प्रचंड मतांनी विजयी करा असे आवाहन काँग्रेसचे शहराध्यक्ष बहादुर भाई यांनी केले. ते प्रभाग क्रमांक ३ मध्ये उमेदवारांच्या प्रचारार्थ काढण्यात आलेल्या रॅलीमध्ये बोलत होते.

परळी नगरपरिषद निवडणूक २०२५ प्रभाग क्रमांक ३ मधील कांग्रेस, वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार सय्यद फारूख गणी व दुसरे उमेदवार शेख बिस्मीला बेगम महेबुब यांच्या प्रचारार्थ भव्य रॅली काढण्यात आली होती.या रॅलीत शहराध्यक्ष बहादुर भाई यांनी घरोघरी जाऊन मतदारांच्या भेटी घेतल्या.व कांग्रेस व वंचित बहुजन आघाडीला परळी शहराचा विकास करण्यासाठी नगर परिषद निवडणुकीत प्रचंड मतदान करून विजयी करण्याचे आवाहन केले.आम्ही परळीचा चेहरा मोहरा बदलू असे प्रतिपादन केले.मतदारांनी जागोजागी त्यांचे स्वागत केले.

या फेरीत शहराध्यक्ष बहादुर भाई, प्रभाग क्रमांक ३ चे उमेदवार सय्यद फारुख गणी, व दुसरे उमेदवार शेख बिस्मीला बेगम सय्यद, तालुकाध्यक्ष अडवोकेट प्रकाश मुंडे, एडवोकेट अनिल मुंडे ,महेश वाकडे,शशी चौधरी, सय्यद इस्माईल, प्रकाश देशमुख ,वैजनाथ गाडेकर, ऋषी लोमटे यांच्यासह काँग्रेस, वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाली होते.

# दावरवाडी येथे राष्ट्रीयकृत बैंकेच्या शाखेची मागणी; लेखी प्रस्ताव सादर

## सामाजिक कार्यकर्ते- कीशोर तांगडे

दावरवाडी प्रतिनिधी/ दावरवाडी ता. पैठण येथे राष्ट्रीयकृत बैंकेची शाखा सुरू करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते किशोर तांगडे यांनी केली आहे. गावकरी अनेक वर्षांपासून ही मागणी करत आहेत, कारण गावातील आर्थिक व्यवहार, शेतकऱ्यांची गरज आणी सुरक्षित व्यवहारांची आवश्यकता लक्षात घेऊन ही शाखा अंत्यत गरजेची आहे.

सामाजिक कार्यकर्ते किशोर पाटील तांगडे यांच्या मागणीची दखल घेत बैंक ऑफ महाराष्ट्राच्या पुणे हेड ऑफिसच्या असिस्टंट जनरल मॅनेजर शिल्पा शिंदे यांनी १८ ऑगस्ट २०२५ रोजी दावरवाडी सर्वे (सर्वेक्षण) करण्याचे आदेश संबंधित विभागाला दिले. त्यानंतर,१० नोव्हेंबर



२०२५ रोजी मी पैठणकर ग्रुपचे किशोर पाटील तांगडे यांच्या वतीने छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या लीड मॅनेजर यांना दावरवाडीत नवीन राष्ट्रीयीकृत बैंक शाखा सुरू करण्याबाबतचे लेखी निवेदन सादर करण्यात आले. या निवेदनासोबत बैंक शाखेची आवश्यकता स्पष्ट करणारे सर्व आवश्यक पुरावे जोडण्यात आले आहेत. मागील आठवड्यात दावरवाडी परिसरातील जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या शाखेची मोठ्या प्रमाणावर चोरी झाल्यामुळे नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना वाढली आहे. याशिवाय गावात एटीएम सुविधा उपलब्ध नसल्यामुळे महीला, शेतकरी, दिव्यांग आणी जेष्ठ नागरिक या सर्वांना आर्थिक व्यवहारासाठी दुरवरच्या ठिकाणी जावे लागते



जालना (वार्ताहर )-क्रीडा युवक सेवा संचलनालय महाराष्ट्र राज्य पुणे व जिल्हा क्रीडाधिकारी कार्यालय हिंगोली यांच्या संयुक्त विद्यमाने व हिंगोली जिल्हा कॅरम असोशिएशन हिंगोली यांच्या सहकार्याने आयोजित विभागस्तरीय कॅरम क्रीडा स्पर्धा २०२५-२६ या स्पर्धा तालुका क्रीडा संकुल वसमत येथे दिनांक २१ व २२ नोव्हेंबर ला पार पडल्या या स्पर्धेत सम्राट अशोक शिक्षण प्रसारक मंडळ दहिपुरी संचलित माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यामंदिर येथील विद्यार्थिनी कु त्रिवेणी विष्णू तोगे हिची राज्यस्तरासाठी १४ वर्ष या वयोगटात निवड झालेली आहे. तिला या शाळेतील स्काऊट मास्टर अब्दुल हकीम अब्दुल करीम पटेल या शिक्षकाने मोलाचे मार्गदर्शन केले तिच्या या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष आदरणीय चंद्रमणीजी खरात साहेब, सचिव अमोल भैय्या खरात मुख्याध्यापक श्री. ठाकूर डी. बी. ज्येष्ठ शिक्षक श्री राठोड पी. आर, उगले पी. एस, अंबडकर एस के, ढेबरे बी. ए, खरात ए. सी,शिंगणे के. बी, श्रीमती पनाड पी. यु,लिहिणार आर बी, खरात एस.पी. शिक्षकेतर कर्मचारी आणि गावकऱ्यांनी विशेष कौतुक करून अभिनंदन केले व रत्नागिरी या ठिकाणी होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# कागदे साहेब, दलित मित्राच्या लेकीवर खऱ्या-खोट्याचा आरोप करण शोभत का ?

## तुम्ही माझे भाऊच मग बहिणीवर एवढ्या खालच्या पातळीवर जाऊन आरोप का ?

### माझ्या जावयाचे बांधव भिमाच्या लेकीला निवडून देण्यासाठी जिवाचे रान करत आहेत

बीड ।प्रतिनिधी

तलाठी, मंडळ अधिकारी म्हणून शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन मी सेवा केली आहे. नायब तहसिलदार या पदासह निवृत्त झाले. बीडच्या नगर परिषद निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून नगराध्यक्ष पदाची उमेदवार म्हणून निवडणुक लढवत आहे. मात्र गेल्या काही दिवसात निवडणुकीत माझ्ो काही बांधव आणि राजकीय विरोधक अत्यंत पातळी सोडून मतांसाठी बोलत आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची लेक म्हणून या लोकशाहीच्या उत्सवात मी सहभागी आहे. मात्र कौटूंबिक पातळीवरचे खोडारडे आरोप करून समाजात गैरसमज निर्माण करण्याचा दुर्देवी आणि केविलवाणा प्रयत्न माझ्ो प्रतिस्पर्धी पक्षाचे लोक करत आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना, शिवसंग्राम मित्रपक्षाच्या नगराध्यक्ष पदाच्या अधिकृत उमेदवार प्रेमलताताई पारवे यांनी पत्रकार परिषद घेवुन त्यांच्यावर होत असलेल्या आरोपा संदर्भात भुमिका स्पष्ट केली. त्या म्हणाल्या, काल माझ्या मुलाला त्याच्या आजारपणात सोडून गेलेल्या पत्नीने जो कांगावा केला, तो केवळ राजकीय हेतूने केला आहे. माझ्या मुलांच्या दोन्ही किडण्या फेल झाल्यानंतर पत्नी म्हणून त्याच्या पाठिशी उभे राहण्याचे सोडून सोशल मिडीयामध्ये व्हिडीओ करत फिरत राहणाऱ्या त्या महिलेने माझ्यावर केलेले आरोप विरोधकांचे कटकारस्थान आहे. काल माझ्यावर आरोप करणाऱ्या महिलेला माझा प्रश्न आहे, नवऱ्याच्या दोन्ही किडण्या गेल्यावर तू कुठे होतीस ? मी आई म्हणून स्वतःची किडणी दिली, एक आई म्हणून मी याचं भांडवल करू इच्छित नाही. कौटुंबिक पातळीवर जाऊन एका महिलेल्या विरोधात विरोधकांनी एवढ्या खालच्या पातळीला जाणे दुर्दैवी आहे. माझी विनंती आहे की, निवडणुक ही मुद्यांवर, विकासावर झाली पाहिजे जर ती जात, धर्म आणि कुटूंबावर जाणार असेल तर विरोधकांची ही नैतिक हार आहे.

माझे बंधु पप्पू कागदे यांनी सुरुवातीला एक प्रेस घेतली. राजकारणापासून दूर असणारी बाई आहे मी, लहान असताना बापाचे दलित राजकारण मी बघितलं.माझा बाप मनोहरराव वंजारे या माणसाची ओळख सांगण्याची जिल्ह्याला गरज नाही. भिमाचं नाव घेऊन रुबाबदार आणि स्वाभिमानी राजकारण माझ्या बापानं केले. दलित मित्र म्हणून आंबेडकरी चळवळीत योगदान दिलं. मात्र या निवडणुकीत राष्ट्रवादी पक्षाने मला संधी दिली तर माझे बंधु पप्पू कागदे यांनी खोटं आणि खरं एस.सी. चा वाद समोर आणला. माझा प्रश्न आहे माझ्या भावाला, हो ते माझे भाऊच आहेत. कारण माझ्या वडिलांकडे जेंव्हा पप्पू कागदे यायचे तेंव्हा म्हणायचे की तुमच्या मुलासारखा आहे. जर माझ्या वडिलांच्या मुलासारखे तुम्ही आहात तर तुम्ही माझे भाऊ आहात. माझ्या भावाला विनंती आहे की, निवडणुका येतील आणि जातील, जय-पराजय होत राहतील मात्र एका दलित मित्राच्या लेकीवर खऱ्या खोट्याचे आरोप करता. कागदे साहेब खरं-खोटं काय असतं ? माझा बाप आज जिवंत नाही नाहीतर 'डीएनए' केला असता. मी आंबेडकरी चळवळीतील लेक आहे, आंबेडकरी चळवळीची मालकी काय माझ्या एका भावाकडे नाही.

अजून एक कागदे साहेब माझ्या

(उर्वरीत पान २ वर)

### माझ्यावरील आरोप म्हणजे विरोधकांचे कटकारस्थान

निवडणुक ही मुद्दयावर आणि विकासावर झाली पाहिजे. मात्र ती जात, धर्म आणि कुटुंबावर जाणार असेल तर ही विरोधकांची नैतीक हार आहे. माझ्या सुनेला पुढे करून ज्या पद्धतीने राजकारण केले जात आहे ते अत्यंत घृणास्पद आहे. विरोधकांनीच तीला पुढे केले. हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. मात्र आत्तापर्यंत ती कधीच मिडीयासमोर आली नाही, जाहिरपणे बोलली नाही, केवळ राजकीय हेतुने प्रेरीत होवुन विरोधकांनी हा माझ्याविरुद्ध डाव रचण्याचा केलेला प्रयत्न आहे. हा सर्व खटाटोप विरोधकांचा असुन त्यांनी अशा पद्धतीचे घृणास्पद राजकारण केले असले तरी जनता माझ्या पाठीशी असल्याचे पारवे यांनी सांगीतले. मी भिमकन्या आहे. चुकीचे कधीच करणार नाही. मी या विषयावर आजपर्यंत काहीच बोलले नाही. मात्र तिने कौटुंबीक बाद चव्हाट्यावर आणला. त्यामुळे आज मला हे बोलावे लागत आहे. मी आतापर्यंत केवळ विकासाच्या मुद्यावर बोलत होते. मात्र विरोधकांनी ही निवडणुक थेट जातीवर आणल्याचा आरोपही पारवे यांनी केला.

# भाजपाच्या उमेदवारांना जनतेतूनच उत्स्फूर्त प्रतिसाद

## बीडमध्ये गुलाबी थंडीत कमळ लागले फुलायला

बीड /प्रतिनिधी

बीड नगरपरिषद निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने प्रचाराची गती वाढवली असून शहरातील विविध प्रभागांमध्ये कॉर्नर बैठका, देवदर्शन आणि जनसंपर्काचा धडाका सुरू आहे.

नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार डॉ.ज्योती रवींद्र घोमरे (घुंबरे) यांच्यासह भाजपच्या सर्व उमेदवारांच्या प्रचारार्थ भाजपचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर, डॉ.सारिका क्षीरसागर यांच्यासह भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते सक्रीय असून नागरिकही मोठ्या उपस्थितीत प्रचारात सहभागी होत आहेत.

शाहू नगरातील श्री हनुमान मंदिर परिसरात डॉ.ज्योती घोमरे (घुंबरे), प्रभाग क्रमांक ९ च्या शितल दत्ता गायकवाड आणि जयश्री मच्छिंद्र कुटे यांच्या प्रचारार्थ आयोजित कॉर्नर बैठकीस प्रभाग क्रमांक ८ चे उमेदवार संध्याताई

(उर्वरीत पान २ वर)





### डॉ.सारिका क्षीरसागर यांच्या डोअर टू डोअर प्रचार रॅली, कॉर्नर बैठका

डॉ.सारिका क्षीरसागर यांनी प्रभाग क्रमांक १० मधील उमेदवार मंगेश अंबादास धोंगडे आणि भाग्यश्री अशोक तांबारे तसेच प्रभाग क्रमांक १२ मधील उमेदवार साहस पंढरीनाथ आदोडे आणि पूजा राजाभाऊ गुजर यांच्या प्रचारार्थ कॉर्नर बैठका घेतल्या. या बैठकींना जिल्हा सरचिटणीस ड.सर्जेराव तांदळे, आबा गुजर, सुनील मिसाळ, संभाजी सुर्वे, डॉ.रमेश शिंदे, अमर सानप, विशाल खाडे, समर्थ तांदळे, दादा मस्के, संदेश खेडकर आदींची उपस्थिती लाभली. प्रभाग क्रमांक १३ मधील समीक्षा शेटे गायकवाड व सय्यद मुस्तफा यांच्या प्रचार बैठका देखील उत्साहात पार पडल्या. याठिकाणी डॉ.क्षीरसागर दांपत्यासह भाजप शहराध्यक्ष अशोक लोढा यांनी मार्गदर्शन केले. संपूर्ण शहरभर उत्साहपूर्ण वातावरण असून भाजपने जनसंपर्काचा वेग आणखी वाढवला आहे.

### पंकजाताईंकडून बीडच्या विकासासाठी भरीव निधीची तरतूद करू : अ‍ॅड.सर्जेराव तांदळे

नगरपरिषद भाजपाच्या ताब्यात आल्यास मूलभूत सुविधांवर अधिक भर देऊ. तसेच, पी.टी.आर. नोंदी, बांधकाम परवाने, ना हरकत प्रमाणपत्र यांसारख्या आवश्यक सेवांचे पूर्णपणे ऑनलाइन पद्धतीने सुलभीकरण केले जाईल. ज्यामुळे नागरिकांना घरी बसून सर्व कागदपत्रे मिळू शकतील. मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या माध्यमातून भरीव निधीची तरतूद करून दिलेल्या आश्वासनांची पूर्तता केली जाईल, अशी ग्वाही भाजपचे जिल्हा सरचिटणीस ड.सर्जेराव तांदळे यांनी दिली आहे.

### जाणीव प्रतिष्ठानच्या सदस्यांसोबत 'चाय पे चर्चा'

बीड शहरातील माने कॉम्प्लेक्स चौकात डॉ.योगेश क्षीरसागर आणि प्रभाग क्र. १५ च्या उमेदवार डॉ.सारिका क्षीरसागर व सनी माने यांनी जाणीव प्रतिष्ठानच्या सदस्यांसोबत 'चाय पे चर्चा' केली. यावेळी प्रतिष्ठानच्या सदस्यांनी प्रभागातील नागरिकांच्या वतीने विविध मूलभूत समस्या मांडल्या. उपस्थित जाणीव प्रतिष्ठानचे सदस्य आणि स्थानिक नागरिकांनी भाजपच्या उमेदवारांना निवडून देण्याचा निर्धार व्यक्त केला. यावेळी बोलताना डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले, धर्माच्या नावावर राजकारण करून नगरपालिका ताब्यात घेण्याचे स्वप्न पाहणाऱ्यांना दूर ठेवा. बीड नगरपालिकेची सत्ता भाजपला दिल्यास आगामी ५ वर्षांत शहराच्या विकासाचे मॉडेल उभे करू. डॉ.सारिका क्षीरसागर यांनीही प्रभाग क्र. १५ सह संपूर्ण शहराचा विकास गतीने करू. बीडकरांना आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध करून देऊ, असे आश्वासन दिले.



# अंबड नगरपरिषद निवडणूक २०२५ भाजप-रासप महायुतीच्या भव्य प्रचार कार्यालयाचे दमदार उद्घाटन

अंबड /प्रतिनिधी

अंबड शहरात नगरपरिषद निवडणूक २०२५ च्या तोंडावर भाजप-रासप महायुतीने आपल्या प्रचाराची धडाकेबाज सुरुवात केली आहे.सबका साथ सबका विकास या घोषणेसह महायुतीच्या भव्य आणि अत्याधुनिक प्रचार कार्यालयाचे उद्घाटन उत्साहात जयघोषात आणि प्रचंड कार्यकर्त्यांच्या उसळत्या उपस्थितीत पार पडले.या कार्यालयाचे उद्घाटन माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री मा. रावसाहेब पाटील दानवे आणि माजी मंत्री, आमदार बबनराव लोणीकर यांच्या शुभहस्ते संपन्न झाले.उद्घाटनाचा क्षण होताच संपूर्ण परिसर विजयघोष ढोलताशांनी आणि कार्यकर्त्यांच्या टाळ्यांच्या कडकडाटाने दणाणून गेला. यावेळी झालेल्या सभेत महायुतीच्या नेत्यांनी अंबडकरांच्या विकासासाठी भाजप-रासपचे उमेदवारच सक्षम असल्याचा ठाम दावा केला.शहराच्या पाणीपुरवठा पायाभूत सुविधा स्वच्छता आरोग्य व सुरक्षिततेसाठी येणारी पाच वर्षे निर्णायक असल्याचे सांगत भाजपाला मत म्हणजे विकासाला मत स्थिरतेला मत असा घोष निनादला. विजयाचा संकल्प कार्यकर्त्यांची जिगरदार उपस्थिती कार्यकर्त्यांनी विकास आमचा ध्यास विजय आमचा श्वास असा नारा देत महायुतीच्या उमेदवारांना प्रचंड मतांनी विजयी करण्याचा संकल्प घेतला. संपूर्ण परिसर भगव्या झेंड्यांनी आणि फडफडणाऱ्या महायुतीच्या ध्वजांनी नटला होता.प्रमुख मान्यवरांची भव्य उपस्थिती या उद्घाटन सोहळ्यास माजी आमदार विलास बापू खरात,भाजप नेते सतीश घाटगे पाटील,दीपक भैया ठाकूर, अनिलराव कोलते पाटील, रमेश महाराज वाघ, केदार कुलकर्णी,देविदास कुचे, डॉ.राजेंद्र ठोसर,औदुंबर बागडे, कृष्णा जिगे,भगवान म्हात्रे, शंकर मामा लहांगे,गोविंद ढेंबरे यांच्यासह महायुतीचे सर्व प्रमुख पदाधिकारी,हजारो कार्यकर्ते आणि मतदार बंधू-भगिनींची विक्रमी गर्दी उसळली होती. या उद्घाटन सोहळ्याने अंबडमध्ये महायुतीच्या प्रचाराला जबरदस्त गती मिळाली असून हवेतच विजयाची चाहूल जाणवत आहे.भाजप-रासप महायुतीचे उमेदवार आता उत्साहाच्या उंच शिखरावरून प्रचाराची झंझावाती सुरुवात करण्यास सज्ज झाले आहेत.

### विकासाचा संकल्प विजयाचा नारा

# अंबड नगरपरिषदेच्या आखाड्यात तरुण तडफदार नेतृत्व प्रभाग क्र.४ मध्ये घड्याळ वेगाने धावणार

## सुशिक्षित,संयमी आणि आक्रमक बाणा- सलमान तांबोळी यांच्या रूपाने मतदारांना मिळाला हक्काचा माणूस

अंबड ।प्रतिनिधी

अंबड नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ ची रणदुंदुभी वाजू लागली असून शहरातील राजकीय वातावरण तापले आहे. मात्र सर्वाधिक चर्चा रंगली आहे ती प्रभाग क्रमांक ४ ची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गट ने या प्रभागातून ओबीसी आरक्षित जागेवर तरुण तडफदार आणि सुशिक्षित चेहरा म्हणून श्री. सलमान अलिम तांबोळी यांना उमेदवारी जाहीर करून विरोधकांचे धाबे दणाणून सोडले आहेत.नागरिकांच्या मनासारखा उमेदवार गेल्या अनेक वर्षांपासून प्रभाग क्र. ४ मधील नागरिक समस्यांच्या विळख्यात अडकले आहेत.अशा वेळी केवळ आश्वासने देणारा नाही तर काम करणारा उमेदवार हवा होता. सलमान तांबोळी यांच्या रूपाने प्रभागाला एक नवीन चेहरा मिळाला आहे.उच्च शिक्षण आणि व्यापारातील सचोटी यामुळे सलमान भाईंची प्रतिमा स्वच्छ आणि



पारदर्शक आहे. त्यांचा हाच गुण प्रभागातील सुज्ञ मतदारांना भावला असून आमच्या मनासारखा उमेदवार मिळाला अशा भावना नागरिक व्यक्त करत आहेत.प्रशासनाला धारेवर धरणारा बुलंद आवाज सलमान तांबोळी यांची ओळख केवळ एक व्यापारी किंवा सामाजिक कार्यकर्ता म्हणून नाही तर अन्यायाविरुद्ध लढणारा नेता अशी आहे.प्रभागातील सांडपाणी असो रस्ते असो किंवा पाणीपुरवठा सामान्य माणसाच्या अडचणींसाठी नगरपरिषद प्रशासनाशी दोन हात करण्याची त्यांची तयारी आहे.लोकांच्या हक्कासाठी शासन दरबारी भांडणारा आणि नडणारा वाघ म्हणजे सलमान तांबोळी अशी चर्चा आता गल्लीबोळात सुरू झाली आहे.सलमान तांबोळी यांची वैशिष्ट्ये सुशिक्षित व व्हिजनरी नेतृत्व केवळ राजकारण नाही तर विकासाचे स्पष्ट व्हिजन.व्यापार व समाजकार्याचा वारसा शब्दाला पक्के आणि मदतीला तत्पर.आक्रमक शैली समस्या सुटेपर्यंत प्रशासनाचा पाठपुरावा करण्याची धमक.ओबीसी चेहरा सर्वसामान्यांच्या वेदना जाणणारे नेतृत्व.प्रभाग क्र.४च्या सर्वांगीण विकासासाठी आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी सलमान अलिम तांबोळी हेच सक्षम पर्याय असल्याचे चित्र स्पष्ट होत आहे. त्यामुळे २०२५ च्या निवडणुकीत या प्रभागातून विजयाचा गुलाल कोण

# अंबडच्या राजकीय आखाड्यात सचिनभाऊ नावाचं वादळ प्रभाग क्र.६ मध्ये विरोधकांचे धाबे दणाणले

अंबड ।प्रतिनिधी

अंबड नगर परिषदेच्या रणधुमाळीत सध्या एकच नाव प्रकर्षाने चर्चिले जात आहे ते म्हणजे सचिन भाऊ खरात प्रभाग क्रमांक ६ मध्ये महायुती रासप च्या या तरुण तडफदार नेतृत्वाने आपल्या समाजकार्याच्या जोरावर अशी काही मुसंडी मारली आहे की विरोधकांच्या पायाखालची वाळू सरकली आहे.

सर्वसमावेशक नेतृत्व आणि विकासाचा ध्यास केवळ निवडणुकीपुरते नाही तर गेल्या अनेक वर्षांपासून निस्वार्थ भावनेने समाजकार्य करणारे व्यक्तिमत्व म्हणजे सचिन भाऊ खरात. जाती पातीच्या भिंती तोडून अठरापगड जाती-धर्माच्या लोकांना सोबत घेऊन चालणारा हा मनमिळावू आणि दिलदार नेता अशी त्यांची ओळख निर्माण झाली आहे.युवकांचा लाडका आणि ज्येष्ठांचा आधारवड असलेल्या सचिनभाऊंनी प्रभागात विकासाचे नवे व्हिजन मांडले आहे, ज्याला मतदारांनी अक्षरशः डोक्यावर घेतले आहे.जनतेचा मिळतोय उदंड प्रतिसाद प्रभाग क्रमांक ६ मध्ये सचिन भाऊ खरात जेव्हा प्रचार दौऱ्यावर निघतात तेव्हा होणारी गर्दी आणि मिळणारा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता ही निवडणूक आता एकतर्फी झाल्याचे चित्र आहे.आता फक्त विकास आणि तोही सचिनभाऊंच्या सोबत असा नारा प्रभागातील नागरिक देत आहेत.त्यांची कामाची पद्धत आणि जनसंपर्क पाहून विरोधक मात्र चांगलेच हवालदिल झाले आहेत.विरोधकांची झोप उडाली.सचिन भाऊंची वाढती लोकप्रियता आणि ग्राऊंड लेव्हल ची मजबूत पकड पाहून विरोधकांचे गणित कोलमडले आहे.प्रतिस्पर्ध्यांना आता आपला पराभव समोर दिसू लागल्याने सचिनभाऊंच्या झंझावातापुढे टिकायचे कसे असा प्रश्न विरोधकांना पडला आहे.

सचिन भाऊ खरात यांचे आवाहन माझा लढा सत्तेसाठी नसून माझ्या प्रभागातील प्रत्येक सामान्य माणसाच्या हक्कासाठी आहे. तुमची साथ आणि माझा विकास हेच माझे ध्येय आहे.प्रभाग क्रमांक ६ अंबड नगर परिषद. उमेदवार सचिन भाऊ खरात महायुती- रासप सर्व समाजाला सोबत घेणारे तरुण तडफदार आणि अभ्यासू नेतृत्व.विजयाच्या दिशेने वेगाने वाटचाल अंबडमध्ये आता एकच हवा सचिन भाऊंचाच दावा अशी चर्चा शहरात सुरू.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग अ‍ॅण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# पापा मोदी हे अंबाजोगाईच्या विकासाचा, विश्वासाचा ब्रँण्ड आहेत - डॉ.राजेश इंगोले

## लोक विकास महाआघाडीच्या राजकिशोर मोदींसह सर्वच उमेदवारांना मिळतोय मतदारांचा आशीर्वाद

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

अंबाजोगाई नगरपरिषद निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार गट), राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार), समाजवादी पार्टी, रिपाइं आठवले गट, मनसे तसेच विविध मित्र पक्ष आणि संघटना पुरस्कृत लोक विकास महाआघाडीच्या नगराध्यक्ष तसेच शहरातील १५ प्रभागातील ३१ उमेदवारांच्या प्रचारार्थ सोमवार, दि.२४ नोव्हेंबर रोजी आयोजित सभेत बोलताना सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांनी पापा मोदी हे अंबाजोगाईच्या विकासाचा, विश्वासाचा ब्रँण्ड आहेत. त्यामुळे सुजाण मतदारांनी लोक विकास महाआघाडीच्या राजकिशोर मोदींसह सर्वच उमेदवारांना आपला मतदानरूपी आशीर्वाद देवून प्रचंड मतांनी विजयी करावे असे आवाहन केले.

लोक विकास महाआघाडीच्या नगराध्यक्ष तसेच शहरातील १५ प्रभागातील ३१ उमेदवारांच्या प्रचारार्थ सोमवार, दि.२४ नोव्हेंबर रोजी आयोजित सभेत बोलताना सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांनी सांगितले की, पापा मोदी हे अंबाजोगाईच्या विकासाचा ब्रँण्ड आहेत. प्रलोभन, आमिष यांना बळी पडून काही जणांनी बेडूक उड्या मारल्या आहेत. गद्दार कोणाचेच नसतात. ज्यांच्याकडे गेले त्यांचेही ते होवू शकत नाहीत. नेते गेले पण, जनता आमच्या सोबत आहे. दादांनी पापासेठ यांना शब्द दिलाय की, अंबाजोगाईच्या विकासाला निधीची कमतरता पडू देणार




नाही. अंबाजोगाईला बारामती सारखे सुजलाम सुफलाम शहर करायचे असेल तर आपण सर्वांनी पापासेठ यांना सहकार्य करावे, मतदानरूपी आशीर्वाद द्यावेत. लोक विकास महाआघाडीच्या सर्वच उमेदवारांना निवडून द्यावे. २०११ साली अंबाजोगाई विकास आघाडी असतानाही जनतेने पूर्ण बहुमताचा आशीर्वाद पापा मोदींना दिला होता. तेव्हाही सभेला आजच्यासारखी रेकॉर्ड ब्रेक गर्दी झाली होती. यावेळी देखील लोक विकास महाआघाडीच्या सर्वच उमेदवारांना प्रचंड मतांनी निवडून द्यायचे आहे. राजकिशोर मोदींनी मागील २५ वर्षे या गावाचा कायापालट केला, विकास केला. शहरात शांतता, सामाजिक एकोपा, सौहार्द टिकून ठेवला. म्हणून अंबाजोगाईच्या सारस्वत, बुद्धिवंत लोकांनी मोदींवर कायम विश्वास ठेवला आहे. अंबाजोगाई ही सांस्कृतिक व शैक्षणिक नगरी आहे. त्यामुळे या नगरीतील सर्वसामान्य जनतेचा विश्वास पापा मोदी या नांवावर आहे. म्हणून २५ वर्षे सातत्याने अंबाजोगाईकर मोदींना निवडून देत आले आहेत. पापा मोदी हे केवळ नांवच नाही तर तो एक विकासाचा, विश्वासाचा ब्रँण्ड आहे. विकास, विकास, विकास काय असतो. तर विकास एका रात्रीत होत नाही. बदलत नाही. तो जादूची कांडी नाही. पापा मोदींनी अंबाजोगाईचा विकास हा मागील २५ वर्षांत टप्पे टप्प्याने केला आहे. पापा मोदींना अंबाजोगाईकर पुढील कारणांमुळे निवडून देत असावेत असे मला वाटते. त्यांची स्वच्छ प्रतिमा, मोदींवरील एकही भ्रष्टाचाराचा आरोप विरोधक अद्याप सिद्ध करू शकले नाहीत. तरीही त्यांच्याविषयी अपप्रचार करतात. पापा मोदींच्या चांगल्या कामाची दखल म्हणून अंबाजोगाईकर त्यांना सतत निवडून देतात. त्यामुळेच डॉक्टर, प्राध्यापक, इंजिनियर, शेतकरी, हमाल, मजूर सर्वजण मोदींच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहतात. जनतेचा समस्या सोडविण्याचे कसब पापा मोदींकडे आहे. मागील चार वर्षे प्रशासकाच्या माध्यमातून विद्यमान आमदारांनी शहर बरबाद करणारा विकास केला आहे. अंबाजोगाईतील रस्ते वर आणि देऊळ, मशिदी व घरे खाली गेली आहेत. पावसाचे पाणी थेट घरांत जात आहे. हा विकास असतो का..? आता अंबाजोगाईकर जनतेने विचार करण्याची वेळ आली आहे. रस्ते नालीच्या कामासाठी कोट्यावधी रूपये आले. पण, या विकास कामात ५० टक्के पार्टनरशिप कोणाची आहे..? स्वच्छता कर्मचाऱ्यांचे पगार वेळेवर होत नाहीत.

# जय भवानीच्या विद्यार्थ्यांची महाराष्ट्र ग्रामीण बँकेस अभ्यास भेट



पाटोदा : प्रतिनिधी -पाटोदा येथिल जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे कला व विज्ञान महाविद्यालयातील हिंदी विभाग आयोजित अध्ययन उपक्रमांतर्गत महाराष्ट्र ग्रामीण बैंके शाखा पाटोदाला विद्यार्थ्यांची अभ्यास भेट करून, तेथिल बँकेच्या दैनदिन कामकाजाची माहिती घेण्यात आली. महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना बँकींग क्षेत्रातील रोजगाराच्या संधी ज्ञात व्हाव्यात व बँकींग क्षेत्रातील कामकाज कळावे. रोजगार व भविष्यातील व्यवहारीक ज्ञान प्राप्त होऊन त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण व्हावा यासाठी महाविद्यालयाचे उपक्रमशील प्राचार्य डॉ. विश्वास कदम व प्राचार्य डॉ सदाशिव सरकटे यांच्या मार्गदर्शनाखाली हिंदी विभाग प्रमुख प्रो. डॉ. वंदन जाधव यांनी या अभ्यास भेटीचे आयोजन केले होते. या अभ्यास भेटीत विद्यार्थ्यांना शाखा व्यवस्थापक श्री. शिन्दे एस बी यांनी विद्यार्थ्यांशी मनमोकळेपणाने संवाद साधत उपलब्ध असणाऱ्या रोजगाराच्या संधी विविध अव्हाने व बदलत्या काळानुसार स्वतः आत्मनिर्भर होण्याची आवश्यकता विशद केली. व बँकींग व्यवहारात विविध ठेवी व विविध कर्ज प्रकाराची सविस्तर माहिति दिली. यावेळी बँकेचे अधिकारी श्रीमती पडवळ के एस श्रीमती चैताली कुसळकर मॅडम. व श्री. लक्ष्मण अंदुरे यांनी ही बँकींग कामकाजा विषयी विशेष माहीती देऊन. विद्यार्थ्यां च्या विविध प्रश्नांची समाधान कारक उत्तरे दिली. या माहीतीमुळे विद्यार्थ्यांनी समाधान व्यक्त केले. ही बँकींग अभ्यास भेट यशस्वी करण्यासाठी अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रा. विनोद किर्दक, समाजशास्त्र विभाग प्रमुख प्रो डॉ सुनील जाधव , प्रा. सोमनाथ घाडगे, प्रा.डॉ. बंडू लोखंडे ग्रंथपाल श्रीमती रकटे जे बी यांचे मोलाचे सहकार्य लाभले. या अभ्यास भेटीत बहुसंख्य हिंदी विषयाच्या विद्यार्थी विद्यार्थींनीनी सहभाग नोंदवला. एका आगळ्या वेगळा उपक्रमामुळे विद्यार्थ्यांनी या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त केले

# वडवणी ग्रामीण रुग्णालयाचे बांधकाम अर्धवट अवस्थेत



वडवणी /प्रतिनिधी -

वडवणी तालुक्यासाठी ग्रामीण रुग्णालयाची मंजुरी मिळुन ही जागे अभावी गेल्या अनेक वर्षापासून इमारतीचे बांधकाम रखडले होते. पण काही दिवसापूर्वी चाटे नावाच्या शेतकऱ्याने जागा उपलब्ध करून देत ग्रामीण रुग्णालयासाठी जागेचे दानपत्र दिले होते.

चौकोट - आमदार प्रकाश दादा सोळंके यांनी लक्ष घालावे. वडवणी येथील ग्रामीण रुग्णालयाचे बांधकाम सुरू असून या बांधकामास आडकाठी करून बांधकाम थांबवण्याचे काम करू नये नागरिकांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नाकडे जाणून-बुजून कोणी अडकाटी करत असेल तर त्यावर कायदेशीर कारवाई करावी अशी देखील मागणी नागरिकांमधून होत आहे.

वडवणी करांचा हा अतिशय महत्त्वाचा प्रश्न आमदार प्रकाश दादा सोळंके यांनी मार्गी लावावा अशी देखील मागणी तालुक्यातील नागरिकांमधून होत आहे. दवाखान्याच्या बांधकामासाठी . आमदार प्रकाश दादा सोळंके यांच्या उपस्थितीत स्वतःची जमीन वडवणी ग्रामीण...

दान केली आणि त्या जागेवर ग्रामीण रुग्णालयाची नवीन इमारतीचे भूमिपूजन माजलगाव मतदार संघाचे आमदार प्रकाश दादा सोळंके यांच्या उपस्थितीत मध्ये मोठ्या थाटामाटामध्ये पार पडले होते. परंतु आता त्याच आरोग्य केंद्राचे बांधकाम रखडलेल्या अवस्थेत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. त्या मागचे कारण दवाखान्याकडे जाण्यासाठी रस्ताच उपलब्ध नसल्याचे समोर आले आहे. काही शेतकऱ्यांनी माझ्या वैयक्तिक शेतातून रस्ता देणार नाही आशा स्पष्ट सूचनाच संबंधित गुत्तेदार व आरोग्य विभागास दिल्या असल्यामुळे संबंधित बांधकाम अर्धवट अवस्थेत रखडले असल्याचे पहावयास मिळत आहे. संबंधित घटने संदर्भात जिल्हा शल्य चिकित्सक बीड यांनी उपविभागीय अधिकारी माजलगाव यांच्या पाठपुरावा केला आहे.

# शेतकऱ्यांच्या सातत्यपूर्ण वीज समस्यांवर उपाययोजनेसाठी

## महावितरण कार्यकारी अभियंत्यासोबत आ.सुरेश धस यांची बैठक



पाटोदा /प्रतिनिधी

शेतकऱ्यांना गेल्या काही महिन्यांपासून भेडसावत असलेल्या अनियमित वीजपुरवठा, ट्रान्सफॉर्मर जळणे, क्षमता अपुरी पडणे आणि पिकांना वेळेवर पाणी न मिळणे या गंभीर समस्यांवर तात्काळ उपाययोजना करण्यासाठी आज महावितरण कार्यालयात सविस्तर बैठक पार पडली. या बैठकीत कार्यकारी अभियंता आणि महावितरणचे अधिकारी यांना आ.सुरेश धस यांनी परिस्थितीची सविस्तर माहिती दिली यांची दखल घेऊन ठोस निर्णय घेण्याचे निर्देश देण्यात आले.

बैठकीत बोलताना आ.धस यांनी मान्यवरांनी सांगितले की, गेल्या काही दिवसांपासून अनेक गावांमध्ये ट्रान्सफॉर्मरांची क्षमता अपुरी पडत असल्याने ते सतत जळत आहेत. त्यामुळे पाण्याच्या पंपांना पुरेसा दाब मिळत नसल्याने शेतकऱ्यांचे पीक धोक्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर अधिकाऱ्यांना दोन दिवसांच्या आत संपूर्ण तालुक्यातील जळालेले आणि बंद अवस्थेत असलेले सर्व ट्रान्सफॉर्मर यांची माहिती मिळवून तातडीने आवश्यक क्षमतेचे नवे ट्रान्सफॉर्मर बसविण्याचे निर्देश आ.धस यांच्या मागणी देण्यात आले.

यावेळी मुख्यमंत्री सौर ऊर्जा योजनेचाही मुद्दा उपस्थित करण्यात आला. खासगी कंपन्या ही योजना राबवत असल्या तरी त्यांच्यावर प्रशासकीय नियंत्रण आवश्यक आहे, असे स्पष्ट सांगण्यात आले. नियंत्रण योग्य पद्धतीने राहिल्यास काम वेळेत पूर्ण होईल, शेतकऱ्यांना दिवसा स्थिर वीज मिळेल आणि उत्पादनक्षमता वाढेल असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

महावितरणच्या अधिकाऱ्यांना अनावश्यक विलंब टाळण्याचे, दुरुस्तीची सर्व कामे वेळेवर पूर्ण करण्याचे, तसेच शेतकऱ्यांसाठी दर्जेदार व अखंड वीजपुरवठा सुनिश्चित करण्यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने मनुष्यबळ आणि साहित्याची उपलब्धता वाढविण्याचे आदेश या वेळी देण्यात आले.

शेतकरी बांधवांच्या अडचणी तातडीने दूर करण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचे सांगून, दिलेल्या प्रत्येक आश्वासनाची पूर्तता करण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला जात असल्याचेही आश्वासन यावेळी देण्यात आले.या महत्त्वपूर्ण बैठकीला आ.सुरेश धस माजी नगराध्यक्ष रंगनाथ धोंडे, नगरपरिषद उपाध्यक्ष शैलेश सहस्रबुद्धे, नगरसेवक शरीफ शेख, भाऊसाहेब निंबाळकर, इम्रान तांबोळी यांच्यासह महावितरणच्या अधिकारी वर्गाची उपस्थिती होती.

# भगवानगड मानवतेच्या ज्ञानाचे मंदिर - उपसंपादक उत्तम बौडखे

## राष्ट्रसंत भगवानबाबांच्या समाधीचे सपत्नीक मनोभावे दर्शन

आष्टी - (प्रतिनिधी) अध्यात्म हा मानवी जीवनातील अविभाज्य घटक आहे. सुखी समाधानी आणि खऱ्या अर्थाने निरामय आयुष्याचे परमार्थिक सुख अध्यात्मक क्षेत्रातून मिळते या अनुषंगाने भगवानगड हे संत भगवानबाबांच्या विचारपुष्पाने समृद्ध झालेले मानवतावादाचे केंद्र आणि मंदिर आहे असे भावोद्गार दैनिक झुंजारनेताचे उपसंपादक तथा वरिष्ठ पत्रकार उत्तम बोडखे यांनी काढले.

रविवारी दि. २३ नोव्हेंबर २०२५ रोजी महाराष्ट्राच्या अध्यात्मातील अत्यंत पवित्र केंद्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भगवानगड या तीर्थस्थळावर राष्ट्रसंत भगवानबाबांच्या समाधीचे सपत्नीक दर्शन घेतल्यानंतर माध्यमांशी बोलताना उपसंपादक उत्तम बोडखे बोलत होते. यावेळी त्यांच्या सौभाग्यवती शिक्षिका श्रीमती बबीताताई बोडखे यांच्यासह पारिवारिक सदस्य उपस्थित होते. प्रारंभी बोडखे परिवाराच्यावतीने उत्तम बोडखे यांनी भगवानबाबांच्या समाधीचे नतमस्तक होऊन मनोभावे दर्शन घेतले. यावेळी भगवानगडाच्यावतीने त्यांचे स्वागत करण्यात आले. उपसंपादक तथा वरिष्ठ पत्रकार उत्तम बोडखे माध्यमांशी बोलताना पुढे म्हणाले की, मी खऱ्या अर्थाने आज धन्य झालो. संत भगवानबाबा यांनी चंद्र




सूर्य असेपर्यंत मानवी जीवनाला पुरेल एवढे आघात ज्ञान दिलेले आहे. शिक्षणाचे महत्त्व त्यांनी त्या काळामध्ये सांगून फार मोठे मानवी जीवनाला उपकारकारक योगदान दिले आहे. भगवानगड हे महाराष्ट्र नव्हे तर देशाच्या अध्यात्मिक इतिहासातील अलौकिक केंद्रस्थान ठरलेले आहे. या गडावर गडाचे महंत डॉ. नामदेव शास्त्री यांच्या कुशल मार्गदर्शनातून देशातील सर्वोत्कृष्ट ज्ञानेश्वर मंदिर साकारत आहे. या मंदिराची पाहणी ही उत्तम बोडखे आणि परिवारांनी केली. उभारणारे हे मंदिर भविष्यातील अनेक पिढ्यांना अध्यात्माचे महत्त्व अधोरेखित करेल असा विश्वासही त्यांनी या बांधकामाचे कौतुक करताना व्यक्त केला.

भगवानगड ज्ञानदानाचे अलौकिक केंद्र

महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. विविध संत परंपरा आणि समृद्ध असे हे राष्ट्र आहे. याच राष्ट्रात भगवानगड हे अध्यात्माचे अत्यंत पवित्र भूमिकेंद्र आहे. महंत डॉ. नामदेव शास्त्री यांच्या कुशल मार्गदर्शनातून होत असलेले ज्ञानेश्वर मंदिर हे भगवान गडाची अध्यात्मक उंची देश आणि जगभर सुगंध पसरवणारे आहे. याचा अभिमान वाटतो असे कौतुक शिक्षिका श्रीमती बबीताताई बोडखे यांनी केले.

# युवा श्रमिकांच्या हक्कां साठी भारतीय जनता मजदुर संघाचा मोठा पुढाकार

## शांत प्रकाशजी जाटव,रौशन कुमारजी, चरणसिंहजी यांचे नेतृत्व सक्षम - भाऊसाहेब घोडके

केज/प्रतिनिधी

देशभरातील युवा श्रमिकां साठी समान वेतन, वेळेवर पगार,सुरक्षित कार्यस्थळ,सामाजिक सुरक्षा आणि नोकरीच्या सुरुवातीला अनिवार्य नियुक्तीपत्र (-ौंळिपींशपीं ङ्गीींशी) मिळावे,यासाठी भारतीय जनता मजदूर संघाने मोठी मोहीम सुरू केली आहे.राष्ट्रीय अध्यक्ष शांतप्रकाशजी जाटव यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सचिव रौशन कुमारजी,राष्ट्रीय महासचिव चरण सिंहजी यांच्या नेतृत्वाखाली या उपक्रमाला गती मिळत आहे.दिल्लीतुन झालेल्या ऑनलाईन महत्त्वपूर्ण चर्चासत्रात युवा श्रमिकांच्या हक्कांवर, रोजगारातील पारदर्शकते वर आणि भविष्याच्या सुरक्षेवर व्यापक चर्चा झाली.यावेळी युवा मोर्चा, मंडल दिल्ली प्रदेशचे उपाध्यक्ष तसेच बीजेएमएस सोशल मीडिया आणि डिजिटल क्रिएटर्स बोर्डचे राष्ट्रीय सचिव रौशन कुमारजी यांनी युवा श्रमिकांच्या समस्यांवर प्रकाश टाकत संघटनेच्या उपक्रमांची माहिती दिली.या प्रसंगी भारतीय जनता मजदूर संघाचे राष्ट्रीय सचिव भाऊसाहेब घोडके यांनी युवा संघटनांना मार्गदर्शन केले.महाराष्ट्रासह विविध राज्यांत युवकांना संघटित करून त्यांना सक्षम करण्याचे कार्य ते सातत्याने करीत असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले.तसेच महाराष्ट्र राज्य सचिव धनंजय कुलकर्णी,मराठवाडा सचिव चंद्रकांत पाटील हे ही युवकांना संघटित करण्याचे कार्य सक्रियपणे करीत असल्याचा उल्लेख करण्यात आला.बैठकीत भोपालसह अनेक भागांत युवा वर्गासाठी कौशल्य विकास,डिजिटल प्रशिक्षण आणि रोजगार निर्मितीच्या नव्या संधी बाबतही सविस्तर चर्चा झाली.केंद्रातील मोदी सरकारने आधीच 'स्किल इंडिया','स्टार्ट-अपइंडिया', 'मेक इन इंडिया', 'ई-श्रम कार्ड योजना' आणि विविध सामाजिक सुरक्षा योजनांच्या माध्यमातून युवा व श्रमिकांच्या सक्षमीकरणासाठी महत्त्वाचे पाऊल उचलले आहे.त्याच धर्तीवर बीजेएमएसच्या वतीने ही श्रमिकांचे हक्क,सन्मान आणि सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी प्रयत्न अधिक तीव्र करण्यात येत आहेत.युवकांच्या भूमिकेवर बोलताना रौशन कुमार म्हणाले की,

युवा सुरक्षित व सशक्त असेल,तेव्हाच देशाचे भविष्य भक्कम होईल.





# तोतया पोलीस खऱ्या पोलिसांच्या जाळ्यात

परळी / प्रतिनिधी

महाराष्ट्र पोलिसांचा गणवेश परिधान करून रेल्वे गाडीत आणि स्थानकावर बिनबोभाट वावर करणाऱ्या तोतया पोलीस व्यक्तीस रेल्वे पोलिसांनी ताब्यात घेऊन त्याविरुद्ध कायदेशीर गुन्हा दाखल केला. सदरील घटना परळी रेल्वे स्थानकावर मंगळवार दि २५ रोजी घडली.

परळी रेल्वे स्थानक परिसर व सांगली पॅसेंजर रेल्वे गाडीमध्ये एक तोतया पोलीस अंगावर महाराष्ट्र पोलीसचा सरकारी गणवेश घालून फिरत असल्याची माहिती परळी येथील लोहमार्ग पोलिसांना मिळाली. लोहमार्ग पोलिसांनी या भामट्या व्यक्तीचा शोध घेऊन चौकशी केली असता त्याने त्याचे नाव.अभंग पंढरी नरवटे रा.खरोसा.ता.औसा.जी.लातूर असे सांगितले व उडवाउडवीची उत्तरे दिली. या प्रकरणावरून लोहमार्ग पोलिसांनी सदरील व्यक्तीस तात्काळ अटक करत त्या विरोधात भारतीय न्याय संहिता कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून या प्रकरणी अधिक तपास एपीआय वाघमोडे यांच्या मार्गदर्शनाखाली कर्मचारी पवार, खडके, सातपुते, घोडके, टिमकीकर हे करत आहेत.

### निवडणुक रणधुमाळीच्या तोंडावर आमदार सुरेश धस यांची

# कट्टर समर्थक योगेश सानप यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट; राजकीय चर्चांना उधाण



पाटोदा , प्रतिनिधी-अगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या तयारीला वेग आले असताना आष्टी- पाटोदा-शिरूर मतदारसंघात महत्त्वाची घडामोड घडली भाजपचे लोकप्रिय आमदार सुरेश आण्णा धस यांनी आपल्या कट्टर समर्थक आणि सक्रिय युवा कार्यकर्ते योगेश सानप यांच्या महासांगवी येथील निवासस्थानी भेट दिली असताना संपूर्ण परिसरात राजकीय चर्चांना उधाण आले आहे. निवडणुकीच्या तोंडावर झालेली ही भेट साधी भेट नसून भाजपच्या आगामी रणनीतीशी थेट जोडली जात असल्याचे स्थानिक राजकीय जाणकार सांगत आहेत. पारगाव पंचायत समिती गणात उमेदवारीबाबत सुरू असलेल्या चर्चांमध्ये या भेटीमुळे स्थानिक पातळीवरील चर्चा आमदार धस यांनी जर पारगाव पंचायत समिती गणातून योगेश सानप यांना उमेदवारी दिली, तर गणातील राजकीय मांडणी पूर्णपणे बदलू शकते, अशी चर्चा जोर धरत आहे. सानप यांचे तरुणांमध्ये मोठे समर्थन, सक्रिय जनसंपर्क आणि कट्टर कार्यकर्त्यांची साथ यामुळे त्यांचे नाव आघाडीवर येत असल्याचे कार्यकर्ते सांगत आहेत. विरोधकांमध्येही या भेटीमुळे चिंतेचे वातावरण निर्माण झाले असुन या भेटीनंतर पारगाव गणात निवडणुकीचे वातावरण तापले असून, कार्यकर्ते आणि ग्रामस्थांमध्ये पुढील घडामोडींबाबत उत्सुकता वाढली आहे. भाजपा कोणाला उमेदवारी देणार आणि मतदारसंघातील पुढील राजकीय समीकरणे कशी बदलणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

एकूणच, आमदार सुरेश धस यांच्या या सदिच्छा भेटीमुळे पारगाव जिल्हा परिषद गटातील राजकीय चित्र बदलण्याची शक्यता अधिक बळकट झाली आहे.

# साने गुरुजी निवासी विद्यालयाचे विभागीय क्रीडा स्पर्धेत घवघवीत यश




केज/प्रतिनिधी

दि.२३ नोव्हेंबर २०२५ रोजी युवक व क्रीडा सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे व क्रीडा अधिकारी कार्यालय परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विभागीय सॉफ्टबॉल स्पर्धा १७ वर्ष वयोगट संपन्न झाल्या.यात साने गुरुजी निवासी विद्यालयाच्या मुलींच्या संघाने छत्रपती संभाजी नगर ग्रामीण,छत्रपती संभाजी शहर,परभणी ग्रामीण,परभणी शहर या संघाना पराभूत करून स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवला.सदर मुलींचा संघ दि.२६ नोव्हेंबर २०२५ पासून नागपूर येथे होणाऱ्या राज्य स्तरीय स्पर्धेत छत्रपती संभाजी नगरचे नेतृत्व करणार आहे.याविद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षक श्री.रामदास सानप सर,सहाय्यक दीपक साखरे सर,श्रीमती कांदे मॅडम,चि.केशव कराड,चि.कृष्णा गित्ते यांचे मार्गदर्शन लाभले होते.याबद्दल बीड जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर सर,मार्गदर्शक रेवन्नाथ शेलार सर, अनिकेत काळे सर,सतीश राठोडसर संस्था अध्यक्ष ड.उद्धवराव कराड, प्राचार्य व मार्गदर्शिका गित्ते मॅडम,कापसे सर, सर्व शिक्षक कर्मचारी यांनी अभिनंदन करून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# येवता जिल्हा परिषद सर्कलमध्ये डॉ.योगिनी थोरात यांची होणार एन्ट्री?

### आयात उमेदवार मतदार स्वीकारतील का हा मोठा प्रश्न ?



केज/प्रतिनिधी

येवता जिल्हा परिषद सर्कलमध्ये राजकारणाला अचानक वेग आला आहे. स्थानिक राजकारणातील नवे व्यक्तिमत्त्व म्हणून योगिनी थोरात यांना पाहिले जाते.या जिल्हा परिषद सर्कलमध्ये निवडणूक लढण्याची शक्यता आहे.त्यांनी पूर्वी होळ जिल्हा परिषद सर्कल मधून निवडणूक लढवली होती.पण सध्या होळ जिल्हा परिषद सर्कल अनुसूचित जाती साठी राखीव असल्यामुळे त्यांना स्वतःचे सर्कल बदलावे लागत आहे. त्यांच्या निर्णयामुळे सध्याच्या राजकीय समीकरणात मोठे बदल होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.डा. योगिनी थोरात यांची ओळख सामाजिक कामात हातभार लावणारी,कार्यशील नेतृत्व म्हणून होत आहे. महिला सक्षमीकरण, शिक्षण आणि आरोग्य विषयक प्रश्नावर त्यांनी सातत्याने आवाज उठवला आहे.त्यामुळे त्यांच्या उमेदवारीकडे अनेकांचे लक्ष लागून राहिले आहे.तथापि, सर्वात मोठा प्रश्न असा आहे की,येवता सर्कल मधील लोक आयात उमेदवार स्वीकारतील काय?

स्थानिक पातळीवर काही मतदार अजूनही पारंपरिक नेतृत्वालाच पसंती देत असल्याचे बोलले जात आहे. तर काही लोकांमध्ये थोरात यांच्याबद्दल सकारात्मक चर्चा रंगली आहे.आगामी काळात त्यांचा प्रचार, मतदारांशी संवाद आणि स्थानिक प्रश्नांवरचे ठोस उपाय याच्यावर त्यांच्या स्वीकारार्हतेचा कौल ठरेल,असे तज्ज्ञांचे मत आहे.येणाऱ्या निवडणुकीत डॉ.योगिनी थोरात यांच्यासमोर विश्वास जिंकण्याचे मोठे आव्हान असणार आहे. पण लोकसंग्रह आणि कार्यकर्ता बळ यांच्या जोरावर त्या हे समीकरण कितपत बदलू शकतात, हे पाहण्यासाठी संपूर्ण सर्कल उत्सुक आहे.

# अहिल्यानगर येथील आजी माजी सैनिक संघटनेचा प्रथम वर्धापन दिन उत्साहात साजरा



पाटोदा /प्रतिनिधी

अहिल्यानगर येथील आजी माजी सैनिक संघटनेचा प्रथम वर्धापन दिन उत्साहात साजरा अभिमानाच्या वातावरणात पार पडला. या विशेष सोहळ्यास पद्मभूषण अण्णा हजारे, लेफ्टनंट जनरल राजेंद्र निंबाळकर, नारायण अंकुश, तसेच -ीरव ेारपवशव उशपींशी, अहिल्यानगर येथील अधिकारी आणि परिसरातील अनेक आजी-माजी सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

समारोहाची सुरुवात राष्ट्रध्वजाला सलामी देऊन झाली. त्यानंतर शहीद जवानांना अभिवादन करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली.अण्णा हजारे यांनी आपल्या भाषणात सैनिकांच्या त्याग, शौर्य आणि राष्ट्रनिष्ठेचे महत्त्व अधोरेखित करत, देशाच्या सीमांचे रक्षण करणाऱ्या जवानांच्या प्रश्नांसाठी समाजाने संवेदनशील राहणे हीच खरी देशभक्ती, असे सांगितले.

लेफ्टनंट जनरल राजेंद्र निंबाळकर यांनी संघटनेच्या उपक्रमांचे कौतुक करत, महाराष्ट्रातील विविध सैनिक संघटना आता एकत्रितपणे सैनिकांच्या हक्कांसाठी आणि न्यायासाठी उभ्या राहत असल्याचे सांगितले. ही एकतेची चळवळ नव्या उर्जेला दिशा देणारी आहे, असे ते म्हणाले.

कार्यक्रमात संघटनेच्या उपक्रमांचा आढावा घेण्यात आला. निवृत्त सैनिकांच्या पुनर्वसन, कुटुंबीयांच्या कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती देण्यात आली. समाजात सैनिकांविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी पुढील वर्षभर विविध उपक्रम राबविण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.उपस्थित सर्व मान्यवरांनी सैनिक समाजाच्या एकतेचे कौतुक करत, एकत्रितपणे लढा दिल्यास कोणताही प्रश्न सोडविणे अशक्य नाही, असा विश्वास व्यक्त केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संघटनेचे पदाधिकारी यांनी केले, तर सूत्रसंचालन आणि आभारप्रदर्शन उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. महाराष्ट्रातील सर्व सैनिक संघटना एकत्र येत असल्याने सैनिकांमध्ये नवचैतन्य आणि अभिमानाची भावना निर्माण झाली आहे.



**आष्टी – कु. निकीता बाबासाहेब पोकळे यांची बास्केट बॉल स्पर्धेत सुवर्ण पदक व त्यांच्या पूर्ण संघाची महाराष्ट्र राज्य क्रीडा महोत्सव स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल सत्कार करतांना संदीप शेठ खकाळ, अजित डिसले सर, जितेंद्र बनकर, बंडु जाधव, बिबीषन पोकळे, बाबासाहेब पोकळे, संदीप जाधव, विक्रम नरवडे, बाळू पोकळे, उद्धव पोकळे, शिवम पोकळे, क्रीडा शिक्षक जमीर सय्यद सर आदी मान्यवर दिसत आहेत.**

# आष्टी चित्रदर्शनचे संपादक जैष्ठ पत्रकार,विचारवंत लेखक,अनंत हंबर्डे यांना पत्नीशोक



आष्टी (प्रतिनिधी)

आष्टी तालुक्यातील प्रसिद्ध विचारवंत, लेखक, साहित्यिक, आष्टी चित्रदर्शन या साप्ताहिकाचे संपादक तथा सेवानिवृत्त उपप्राचार्य अनंत हंबर्डे यांच्या पत्नी देवकी अनंत हंबर्डे (वय ८५) यांचे वृद्धापकाळाने मंगळवारी निधन झाले. त्यांच्या पाठीमागे पती, मुलगा, नातसून, नातवंडे असा मोठा परिवार आहे. अनंत हंबर्डे हे आष्टी तालुक्यातील ज्येष्ठ पत्रकार आणि आजी - माजी आमदारांचे गुरु आहेत. त्यांनी माजी आमदार भीमराव धोंडे, माजी आमदार साहेबराव दरेकर, आमदार सुरेश धस, बीड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष विजय गोल्हार यांना थेट अध्यापन केलेले आहे. अनंत हंबर्डे यांचे मित्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे सेवानिवृत्त कुलगुरू नागनाथ कोत्तापल्ले, डॉ. शिवाजीराव भोसले, अनंत भालेराव, संजीव उन्हाळे, महावीर जोंधळे, हा. कि. तोरडमल, मोतीराम वरपे, नामदेव क्षीरसागर, सर्वोत्तम गावस्कर, सुनील क्षीरसागर, अशोक देशमुख, नरेंद्र कांकरिया यांच्यासह जेष्ठ संपादक, लेखक, साहित्यिक, विचारवंत हे त्यांचे जवळचे मित्र आहेत. अनंत हंबर्डे हे आष्टी शहर सोडून पुणे, संभाजीनगर, नाशिक, लातूर आदी शहरात नोकरीनिमित्त गेले असते तर ते विद्यापीठाचे कुलगुरू झाले असते अशी त्यांची प्रतिमा आणि प्रतिभा आहे, परंतु आपल्या मातीचा अभिमान, स्वाभिमान त्यांनी ठेवून आष्टी शहर सोडले नाही म्हणून ते आष्टीतच राजकारण, समाजकारण करत राहिले. अनंत हंबर्डे सर यांचे वय आज ८७ वर्षे आहे. आष्टी चित्रदर्शनचे संपादक जेष्ठ पत्रकार प्रा. अनंत हंबर्डे यांच्या पत्नी देवकी अनंत हंबर्डे यांचा अंत्यविधी मंगळवारी रात्री सोलेवाडी - जामगाव रस्त्यावरील खंडोबा मंदिरासमोर असलेल्या शेतात झाला.

# 'श्रद्धा क्लीनिक' चा ४३ वा वर्धापन दिन वडवणीत उत्साहात साजरा

वडवणी /प्रतिनिधी

वडवणी शहरातील तब्बल १६ हजार दिवस दिली अविरत रुग्णसेवा, जोपर्यंत पंचेंद्रिय कार्यकरतील तोपर्यंत रुग्णसेवा करणार - डॉ. पारसमल नहार यांचा निर्धार परिस्थिती कितीही बिकट असली तरी शून्यातून विश्व कसे निर्माण करायचे याचा आदर्श म्हणजे ज्येष्ठ डॉ. पारसमल(अंकल)नहार आहेत. वडवणी तालुक्यातील डॉ. पारसमल नहार भूमिपुत्र आहेत. समाजकारण आणि व्यवसायात , राजकारण यात नहार कुटुंबाचे मोठे प्रस्थ आहे. त्यांचे वडील स्व. पन्नालालजी नहारयांनी उच्च शिक्षण घेण्यासाठी, डॉक्टर होण्यासाठी व गोरगरीब जनतेची सेवा करण्यासाठी त्यांना मोठ्या शहरात पाठवले होते. डॉक्टर कीची पदवी संपादन केल्यानंतर वडवणी आले. वडिलांचे स्वप्न सार्थकी ठरवले.आरोग्यसेवेमध्ये आपले पाऊल टाकले. सर्वसामान्य कुटुंबात जन्म घेतलेले डॉ. पारसमल नहार यांनी डॉक्टरकिची उच्च पदवी संपादन केल्यानंतर आपण ज्या भागात जन्मलो, त्या भागातील नागरिकांना उपचाराकरता शहरात जाण्याची गरज भासू नये, पैशाची व वेळेची बचत व्हावी, आजाराचे योग्य निदान आणि उपचार व्हावे, यासाठी वडवणी तालुक्यातील मध्यवर्ती ठिकाणी चांगल्या प्रकारच्या सुविधा असणारे क्लिनिक २५ नोव्हेंबर १९८३ 'श्रद्धा क्लीनिक, नावाने वडवणीमध्ये दवाखाना सुरू केला. व अविरत आरोग्यसेवेचा श्री गणेशा केला. मोठ्या-मोठ्या शहरात ज्याप्रमाणे सुविधा मिळतात, त्याप्रमाणे ग्रामीण भागातील रुग्णांना त्या सुविधा मिळाव्या हा साहेबांचा माणस होता. आजच्या हॉस्पिटलचे वटवृक्षात रूपांतर झाले आहे. तिथे सर्व प्रकारच्या आजाराचे निदान आणि उपचार या हॉस्पिटलमध्ये करण्यात येते. गेली ४०वर्ष २४/७ अविरत सेवा प्रदान करून, आरोग्यसेवा हीच ईश्वर सेवा हे ब्रीद वाक्य आपल्या आचरणात आणून मागील ४ दशके रुग्णसेवा करत आहे.



पुढे या सेवेला खंड पडू नये यासाठी; त्यांनी आपले तिन्ही मुलांना आरोग्यसेवेची शिक्षण दिले. त्यांचा मोठा मुलगा प्रतीक नहार डी.फार्मसी आहे, तर त्यांचा मधला डॉ.सुमित चइइड.चऊ त्वचारोग तज्ञ आहेत. व डॉक्टर सुमीत नहार यांनी रिवा स्किन क्लिनिक नावाने मोढा रोड, दैनिक लोकाशा ऑफिस समोर बीड येथे एक सुसज्ज असा दवाखाना उभारला आहे, व तेथे त्वचा रोगा संबंधी अनेक आजारांवर अतिशय अल्प दरात उपचार करत आहेत, आपल्या मातीशी नाळ जोडली राहावी यासाठी आपल्या जन्मगावी वडवणी येथे ते दर बुधवारी श्रद्धा क्लिनिक येथे उपलब्ध राहून ग्रामीण भागातील शेतकऱ्याना, कष्टकऱ्यांचा उपचार करत आहेत. व त्यांच्या आजारावर अल्प दरात निदान करत आहेत. त्यांचा धाकटा मुलगा डॉ. धीरज नहार देखील डॉक्टर आहे. त्याचबरोबर त्यांनी नीटचे ( डॉ. नहार बायलॉजी हाऊस ) नावाने क्लासेस सुरू करून आपल्या तालुक्यातील व आपल्या जिल्ह्यातील गरीबातील गरीब विद्यार्थ्यांना चांगलं शिक्षण मिळावं यासाठी अल्प दरात ते त्यांना शिकवत आहेत. व त्यांचं एमबीबीएस होण्याचं स्वप्न पूर्ण करत आहे.त्यांच्या मोठ्या सुनबाई सौ.डॉ.पायल सुमित नहार या एम.डी होमिओपॅथिक आहेत .व त्या महिलांना आरोग्य मध्ये काही कमतरता भासू नये, यासाठी आरोग्य सेवा देत आहेत. सौ. प्राची धीरज नहर डी.फार्मसी असून है सुधा मेडिकल दुकान बीड येथे पाहतात .

कोरोना काळात डॉ. पारसमल नहार हे कोरोना-योध्या सोबत 'देवदूतच' ठरले आहेत. मागील ४/५ वर्षापुर्वी संपूर्ण भारतभर कोरोनाने हाहाकार माजलेला असताना, कोरोनाला चार हात करून अहोरात्र रुग्णांना त्यांनी तपासले, त्यांना योग्य ती ट्रीटमेंट दिली. कोरोनाची भीती यांच्यामधून त्यांनी घालवली. आपल्या जीवाची पर्वा न करता २४ तास आरोग्य सेवा दिली , अशा या उत्तम सेवेबद्दल त्यांना कोरोनायोद्धा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते.

डॉ.पारसमल(अंकल) नहार यांना त्यांच्या मागील ४ दशके अविरत आरोग्य सेवे बद्दल राज्यस्तरीय पुरस्कार पद्मविभूषण डॉ. सुरेश आडवाणी यांच्याकडून देण्यात आला. त्या पुरस्काराचे वैशिष्ट्य म्हणजे , महाराष्ट्रातून फक्त ६ डॉक्टरांना सन्मानित करण्यात आले होते. ते बीड जिल्ह्यातील एकमात्र डॉक्टर होते. गत मागील ६ महिन्यापासून हा पुरस्कार देण्यासाठी सर्वे सुरू होता.या सर्वेचा कुणालाही सुगावा न लागावा यासाठी अखिल भारतीय आरोग्य परिषदेकडून मोठ्या प्रमाणात काळजी घेतली होती. हा पुरस्कार वडवणी तालुका मिळाल्यामुळे अनेक मान्यवरांनी त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला होता.

डॉ. पारसमल नहार हे श्रद्धा क्लिनिकच्या रूपाने एक प्रकारे देवदूत भेटले अशा प्रकारची भावना अनेकांनी व्यक्त केल्या आहेत. आरोग्य क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे नहार हॉस्पिटल आपला ४३ वा वर्धापन दिन धुमधडाक्यात साजरा करीत आहे. साहेबांचा माध्यमातून त्यांचा सामाजिक उपक्रमात सहभाग आहे. रुग्णालयात असलेल्या अद्ययावत सुविधांमुळे रुग्णांची सोय झाली आहे. रुग्णसेवेसोबतच सामाजिक कार्यात सहभागी असलेले डॉ.पारसमल(अंकल) नहार यांच्या अत्याधुनिक रुग्णालयामुळे वडवणीरकरांची सोय झाली आहे. प्रसन्न आणि आश्वासक असा त्यांचा चेहरा पाहिला, की रुग्णाचा अर्धा आजार पळून जातो. वडवणी तालुक्यात तब्बल ४३ सेवा देणारे, सर्वात जुने व विश्वासू असे एकमेव डॉक्टर आहेत .डॉक्टरकिला डॉ.पारसमल नहार यांनी कधीही याकडे पैसे कमावण्याचे साधन म्हणून पाहिले नाही.वडवणीत गेली ४३ वर्षे आरोग्य सेवेची महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या आणि त्यात कृतीशील पुढाकार घेणाऱ्या वडवणीचे ज्येष्ठ डॉ.पारसमल (अंकल) नहार यांच्या श्रद्धा क्लीनिक' ४३ व्या वर्धापनदिनानिमित्त तालुक्यातील विविध क्षेत्रात कार्यरत असलेले मान्यवर, वकील मंडळी,पत्रकार बंधु, पोलीस कर्मचारी, राजकीय मंडळी, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर, डॉक्टर बंधू, कौटुंबिक सदस्य व तालुक्यातील जवळपास ५० गावचे लोक उपस्थित होते. सर्वांनी ४३ व्या वर्धापन दिनानिमित्त ज्येष्ठ डॉक्टर पारसमल नहार यांना शुभेच्छा दिल्या. अशीच सेवा त्यांची हातुन अविरत सुरु राहो अशी ईश्वरचरणी प्रार्थना ही केली.

शिव भावे' घडते आपल्या हातून रुग्ण सेवा,
त्यातून मिळतो अध्यात्मिक आनंदाचा ठेवा।
घडता आपल्या हातून अशी सेवा,
रुग्णांच्या पाठीशी आशीर्वादाचा ठेवा।
वैदकीय अधिकाऱ्या सवे सर्व कर्मचारी,
रुग्णांची परोपरी करतात सेवा चाकरी।
सेवेचा आनंद घेऊन जातो घरी,
नित्य आपली आठवण राहील जीवनानंतरही।
अशीच घडो आपल्या हातून रुग्णांची सेवा,
नित्य मिळेल आपल्याला शुभ आशीर्वादाचा मेवा।
जोशी पांडुरंग देतो आपणास हार्दिक शुभकामना,
उत्तरोत्तर घडो दवाखान्याची प्रगती हीच ईश्वरचरणी प्रार्थना।

# धर्माधिष्ठीत समाजनिर्मितीत संतांचे योगदान- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

छत्रपती संभाजीनगर ।प्रतिनिधी

आपल्या देशाला सनातन संस्कृतीची परंपरा आहे. या परंपरेतील धर्माधिष्ठीत समाजनिर्मितीत व राष्ट्राच्या उभारणीत संतांचे मोठे योगदान आहे,असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वेरुळ येथे केले.संत जनार्दनस्वामी यांच्या वेरुळ येथील आश्रमात ॐ जगद्गुरू जनशांती धर्म सोहळा सुरु आहे. या सोहळ्यास मुख्यमंत्री फडणवीस यांनी आज भेट दिली. संत शांतीगिरी महाराज हे त्यांचे समवेत उपस्थित होते. यावेळी आ. संजय केणेकर, आ. प्रशांत बंब, सुरेश चव्हाणके आदी उपस्थित होते.मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते



७५१ कुंड यज्ञशाळा प्रवेश सोहळा तसेच भगवान शिव मूर्तिचे पूजन व उदघाटन करण्यात आले. कार्यक्रम स्थळी येताच मुख्यमंत्री फडणवीस यांनी उपस्थित संत महंत यांच्यावर पुष्पवृष्टी केली. त्यानंतर संत नागेश्वरानंद आणि संत अवीमुक्तेश्वरानंद स्वामी यांनी फडणवीस यांचे स्वागत केले.

आपल्या संबोधनात श्री. फडणवीस म्हणाले की, संत शांतीगिरी महाराजांच्या एका अनुग्रहाने लाखो लोकांचे जीवन बदलले आहे.संतांच्या शिकवणीमुळे आपली संस्कृती, धर्म प्रचाराचे कार्य सुरु आहे. देशात शांती स्थापन करुन आपला देश प्रगतीपथावर नेण्याचे कार्य पुर्णत्वास नेण्याचे सामर्थ्य या संतांच्या आशिर्वादात आहे. धर्माधिष्ठीत समाज निर्मितीसाठी व अशा समाजाद्वारे राष्ट्र उभारणीत संतांचे मोठे योगदान आहे,असे त्यांनी सांगितले.

## कल्याणस्वामी संस्थांनचा कलशारोहन सोहळा,

# हेलिकॉप्टरने पुष्पवृष्टी ;साखरे महाराजाच्या कीर्तनाने सप्ताहाची सांगता

बीड /प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील चकलांबा येथील श्रीक्षेत्र कल्याणस्वामी संस्थानच्या मंदिराचा भव्य कलशारोहण सोहळा व अखंड हरिनाम सप्ताह, ११ कोटी नामजप, त्रिकाल हरिपाठ कार्यक्रमाची सांगता मंगळवार दिनांक २५ नोव्हेंबर रोजी कल्याणस्वामी महाराजाच्या मंदिरांवर हेलिकॉप्टरने पुष्पवृष्टी करण्यात आली. यावेळी संत, महंत मोठ्या संख्येने उपस्थित होते. भाविकांनी हरिनामाच्या जयघोषात सोहळा साजरा केला.

कलशारोहण कार्यक्रमाच्या निमित्ताने होमहवन आदी धार्मिक कार्यक्रम झाले.या सोहळ्याच्या निमित्ताने सुप्रसिद्ध, नामांकित कीर्तनकाराच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.श्रीक्षेत्र कल्याणस्वामी संस्थानच्या अध्यक्षा ह.भ.प. साध्वी सोनाली दिदि उपाध्यक्ष तथा महंत ईश्वर स्वरूप चैतन्य महाराज यांच्या मार्गदर्शनात 'न भूतो न भविष्यती' कलशारोहण सोहळा व हरीनाम सप्ताह संपन्न झाला.

कलशारोहन कार्यक्रमासाठी नवसारी, सुरत येथील स्वामी श्रीहरी जीवनदास शास्त्री संस्थापक श्रीनारायण मुनी दिव्यधाम, महंत स्वामी जनार्दन महाराज मच्छिंद्रगड, महामंडलेश्वर १००८ त्रिवेंद्रानंद सरस्वतीजी महाराज, इंदूवासिनी संस्थान, महंत राधाताई सानप महाराज, आईसाहेब संस्थान, महासांगवी, सांगळे महाराज आदी साधू, संत उपस्थित होते

सप्ताहात प्रबोधनकार ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख, इंदुरीकर यांचे कीर्तन,



हभप आदिनाथ महाराज शास्त्री तारकेश्वरगड, गोरक्षक रामायणाचार्य ह.भ.प. गुरुवर्य संजय महाराज पाचपोर, गुरुवर्य ह.भ.प. गहिनीनाथ महाराज औसेकर, पंढरपूर, हभप अच्युत महाराज दस्तापुरकर, धर्मगुरू अमृता आश्रम स्वामी महाराज, बीड यांचे कीर्तन, ह.भ.प. साधी सोनाली दीदी, अध्यक्ष श्रीक्षेत्र कल्याण स्वामी संस्थान, चकलांबा आदींची कीर्तनसेवा झाली.

मंगळवार दिनांक २५ नोव्हेंबर रोजी कीर्तनकेसरी ह.भ.प. अक्रूर महाराज साखरे यांचे काल्याचे कीर्तनाने सप्ताहाची सांगता झाली.कार्यक्रमास सुप्रसिद्ध महंत, मठाधिपती, गायनाचार्य, वादनाचार्य बीड जिल्हा आणि महाराष्ट्रातून भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उद्योजकतेत भांडवलापेक्षा आयडियालाच अधिक महत्त्व - प्रा. प्रदीप रोडे

## तुलसी इंग्लिश स्कूलमध्ये उद्योजकता प्रबोधन सत्रात प्रा.प्रदीप रोडे यांचे मार्गदर्शन

बीड /प्रतिनिधी

उद्योग करण्यासाठी भांडवलापेक्षा आयडिया जास्त महत्त्वाची असते. तुमच्याकडे उत्तम कल्पना असेल, तर गुंतवणूक आपोआप मिळते, असे प्रतिपादन तुलसी शैक्षणिक समूहाचे संचालक प्रा. प्रदीप रोडे यांनी केले. ते सोमवार, दिनांक २४ रोजी देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी इंग्लिश स्कूल, बीड येथे आयोजित उद्योजकीय कार्निव्हल व उद्योजकता प्रबोधन सत्रात बोलत होते.

या कार्यक्रमाला संस्थेच्या प्रतिनिधी म्हणून डॉ. प्रियांका रोडे तसेच शाळेच्या प्राचार्या सौ. उमा जगतकर उपस्थित होत्या. प्रा.प्रदीप रोडे पुढे म्हणाले की, आजच्या काळात नाविन्यपूर्ण गोष्टींना बाजारात मोठी मागणी आहे. विद्यार्थ्यांनी



प्रॉडक्ट चांगला तयार करण्याबरोबरच तो आकर्षक पद्धतीने प्रेझेंट करण्याचे कौशल्य आत्मसात केले पाहिजे. हे कौशल्य आत्मसात झाले, तर भविष्यात तुम्ही मोठे उद्योजक बनू शकता, असे नमूद केले.

या कार्निव्हलमध्ये विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेले प्रॉडक्ट्स, हस्तकला साहित्य, सजावटीच्या वस्तू, मॉडेल्स, फूड आयटम्स तसेच उद्योजकीय संकल्पनांवर आधारित प्रकल्पांची आकर्षक मांडणी केली होती. मान्यवरांनी सर्व स्टॉलना भेट देऊन विद्यार्थ्यांच्या नाविन्यपूर्ण कल्पना, प्रेझेंटेशन कौशल्य आणि क्रिएटिव्हिटीचे कौतुक केले.

यानंतर मॅक्सिमम सेल्स, बेस्ट इनोव्हेटिव्ह आयडिया आणि युनिक आयडिया या श्रेणींमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी आयोजित पॉडकास्ट सत्रात विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी प्रा. प्रदीप रोडे यांना विविध प्रश्न विचारत संवाद साधला. स्टार्टअप्स, मार्केटची गरज, गुंतवणूक आणि नवकल्पनांची उपयुक्तता यावर चर्चात्मक वातावरण रंगले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सय्यद सिद्दीक यांनी केले,

# मुख्यमंत्री फडणवीस यांच्या कुशल नेतृत्वामुळे मतदारसंघातील विकासकामांना गती-आ.धस

पाटोदा । प्रतिनिधी

आष्टी-पाटोदा-शिरूर मतदारसंघत २३ नोव्हेंबर रोजी आमदार सुरेश धस यांच्या कार्यकाला वर्ष पूर्ण झाले या पार्श्वभूमीवर या संपूर्ण वर्षात मतदारसंघात झालेली विकासकामांची प्रगती ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वामुळे शक्य झाल्याचे आमदार सुरेश धस यांनी

बोलताना स्पष्ट केले. विशेषतः दहा वर्षे केवळ चार ते पाच टक्क्यांवर अडकलेली शिंपोरा-खुंटेफळ उपसा सिंचन योजना त्यांच्या पुढाकारानंतर तब्बल ७० टक्क्यांपर्यंत पोहोचली असून, या योजनेमुळे हजारो शेतकऱ्यांचे आयुष्य बदलणार आहे. या योजनेचा शुभारंभ स्वतः मुख्यमंत्री फडणवीस यांनी केला होता आणि त्यानंतर कामांना अभूतपूर्व गती मिळाल्याचे त्यांनी सांगितले.

पाटोदा व शिरूर तालुक्यातील विविध प्रलंबित कामांनाही या वर्षात चालना मिळाली आहे. वाघाचा वाडा येथील सिंचन प्रकल्प, पैठण-पंढरपूर मार्गाच्या अडथळ्यातील टप्पे, शिरूर तालुक्यातील दोन बॅरेजेस आणि आष्टीतील सिंचन सुविधा या सर्व कामांना नवसंजीवनी मिळाली आहे. निधी काहीसा कमी असला तरी विकासकामे कोणत्याही परिस्थितीत थांबवलेली नाहीत, असेही आमदार धस यांनी नमूद केले. यंदा झालेल्या अतिवृष्टी, ढगफुटी । आणि जमिनी खरडून जाण्याच्या दुर्घटनांबाबत बोलताना त्यांनी सांगितले की, बाधित क्षेत्रांना भेट दिल्यानंतर त्यांनी तातडीने मुख्यमंत्र्यांकडे अतिरिक्त मदतीची मागणी केली आणि त्यानंतर राज्य सरकार व



एनडीआरएफमार्फत हेक्टरी तब्बल तीन लाख ४७ हजार रुपयांची मदत जाहीर झाली. सोशल मीडियावर काहीजणांनी पंजाबमधील मदतीचा दाखला देत टीका केली असली तरी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या निर्णयामुळे ती सर्व भ्रमित टीका आपोआप थांबली आणि शेतकऱ्यांना दिलासा मिळाला,



# डॉ. सबा शफीयोदिन जहागीरदार शेख शिराढोणचे भूषण

शिराढोण /प्रतिनिधी

येथील नेत्रचिकित्सा अधिकारी डॉक्टर शफीयोदिन जहागीरदार शेख व मुख्याध्यापिका जी. पी शाळा रुई तब्सुम जहागीरदार शेख यांची कन्या डॉ. सबा शफियोद्दीन जहागीरदार हीने पुणे येथील रंगूनवाला कॉलेज येथून बीडीएसची पदवी व पी जी डी सी सी क्लीनिकल कॉस्मेटोलॉजी ही पदवी पुणे विद्यापीठातून प्राप्त केली. तसेच पुणे येथील हांडेवाडी येथे रुग्णांना सेवा देण्यासाठी डेंटल क्लिनिकचे उद्घाटन दिनांक २२ नोव्हेंबर २०२५ रोजी मुस्लिम को-ऑपरेटिव्ह बँक यांचे माजी संचालक श्री मंजूर जहागीरदार व हांडेवाडी येथील माजी नगरसेवक अशोक भाऊ नवले यांच्या हस्ते करण्यात आले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुक्रम जहागीरदार सामाजिक संस्थेचे सचिव मैनुद्दीन जहागीरदार यांनी केले यावेळी सामाजिक कार्यकर्ते कुलदीप गायकवाड यांनी मार्गदर्शन केले. ते म्हणाले की आपले दात आपल्या शरीराचा महत्वपूर्ण अवयव आहे. दातांची निगा राखली नाही तर दात सडतात खाण्यासाठी बाधा निर्माण होतात तसेच अनेक हानिकारक आजाराचा सुद्धा सामना करावा लागतो.या वेळी प्रा. रफीक सर,दैनिक राजयोग चे तालुका प्रतिनिधी बिलाल कुरेशी , दौलत पालकर, सुधीर जाधवर,प्रा.शाहीदा जहागीरदार, गोविंद लोमटे, तौफिक देशमुख, खुर्शिद देशमुख,डॉ. समीद जहागीरदार/शेख, अवधूत पाटील , शुभम महाजन राजेश वाघमारे यांनी प्रमुख उपस्थिती दर्शवली.या कार्यक्रमाचा समारोप मनरेगाच्या सोशल ऑडिटर सौ लतिफा काझी/जहागीरदार यांनी केला.

# विद्यार्थी केंद्रबिंदू मानून सामाजिक जाणीव ठेवून मदत करणारे प्रोफेसर डॉ.दिवाण यांचा सत्कार संपन्न

## दान पारमितेचे पालन करून धम्मदीप बुद्ध विहारा करिता धम्मदान

बीड ।प्रतिनिधी

भीम जयंती असो, सामाजिक, शैक्षणिक, संस्कृतिक व विध्यार्थी हिताच्या कार्यक्रमात तसेच महामानव अभिवादन ग्रुप बीड व वाचाल तर वाचाल फिरते मोफत वाचनालयाला मौलिक मार्गदर्शन व सहाय्य करणारे प्रा. डॉ शिवाजीराव दिवाण यांना प्रोफेसर पदी पदोन्नती मिळाल्या बद्दल धम्मदीप बुद्ध विहार (बलभीम नगर ) शिवाजीनगर बीड येथे महामानव अभिवादन ग्रुप, वाचाल तर वाचाल वाचनालय व धम्मदीप बुद्धविहार कमिटी तर्फे मा. से. नी. सी ई ओ पी. व्ही. बनसोडे यांच्या अध्यक्षतेखाली प्रो. डॉ. उपप्राचार्य उत्तमराव साळवे यांच्या हस्ते शाल पुष्पगुच्छ व त्रिसरण पंचशील हाच जीवनमार्ग देऊन सपत्नीक सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डी. जी. वानखेडे यांनी केले तर सूत्रसंचालन ड तेजस वडमारे यांनी केले. विचारमंच्यावर अभिवादन ग्रुप चे अध्यक्ष जी एम भोले, कॅप्टन राजाभाऊ आठवले, ड हनुमंत कांबळे,प्रशांत वासनिक, डी एम राऊत यांची उपस्थिती होती. सर्व प्रथम तथागतांच्या प्रतिमेस पुष्प,छत्रपती शिवाजी महाराज, डॉ बाबासाहेब आंबेडकर, माता रमाई यांच्या प्रतिमेस पुष्पमाला अर्पण करून त्रिवार अभिवादन करण्यात आले. त्रिसरण पंचशील ग्रहण केल्या नंतर सत्कार मुर्ती डॉ दिवाण च्या सुविद्य पत्नी सुप्रसिद्ध कवयित्री, लेखिका आयु माया दिवाण -सोनवणे आपल्या मनोगतात जीवनसाथी बद्दल भावुक होऊन बोलतांना म्हणाल्या की, जीवन साथी बद्दल बोलतांना एकाच वाक्यात बोलेल की डॉ. दिवाण सर एक भला माणूस आहे.ह्या त्यांच्या एका वाक्यातच सरांची विध्यार्थ्यां बद्दल मदतीची तळमळ त्यांनी शिक्षण काळ भोगले कष्ट व खेड्यातून येऊन उच्चशिक्षणासाठी घेतलेले परिश्रम



आणि त्यातून मिळविलेल्या ज्ञानाचा व आर्थिक सुबत्तेचा उपयोग डॉ. बाबासाहेबांनी सांगितल्या प्रमाणे उत्पन्नाचा २०वा भाग समाजाच्या उद्धाराकरिता दान रूपात केला पाहिजे हे लक्षात ठेऊन पदोन्नती झाल्यामुळे( इन्क्रिमेंट )पगार वाढीचा पहिला लाभ तथागतांनी सांगितलेल्या दान पारमितेचे पालन करून महामानव अभिवादन ग्रुप व वाचाल तर वाचाल वाचनालय करीत असलेल्या सामाजिक कार्याकरिता तसेच बीड शहराच्या मध्यभागी असलेल्या धम्मदीप बुद्ध विहाराच्या अपुऱ्या राहिलेल्या पुढील बांधकामा करिता दान करण्याचे जाहीर केले. धम्मदीप बुद्धविहारा करिता आयु माया दिवाण यांनी लिहिलेले, रमाई जीवनचरित्र १५ पुस्तकांची उपस्थित महिला व उपासकांना भेट दिली. प्रा. डॉ. साळवे सरांनी नविन शैक्षणिक धोरणातून होणारे बदल अनेक उदाहारनाद्वारे समजावून सांगितले. माता रमाई ने डॉ. बाबासाहेबांच्या शिक्षणासाठी घेतलेले कष्ट व डॉ. बाबासाहेबानी उच्च शिक्षणासाठी परदेशात केलेला १८-१८ तास अभ्यास व त्यातून त्यांनी प्राप्त केलेल्या विद्येला शील व करुणेची साथ देऊन समाजाच्या हिता करिता,भारताच्या हिता करिता केलेले कार्य समजावून सांगितले. अध्यक्षीय समारोपात पी. व्ही. बनसोडे म्हणाले की शिक्षणामुळे पुढे गेलेल्यांनी बुद्धिजीवी, नौकरदारांनी सामाजिक जाण ठेऊन समाजाची सेवा करावी, त्या करिता सर्वांनी एकत्र येऊन ठोस कृती कार्यक्रम ठरवून तो पूर्णपणे कसा राबवीता येईल या बद्दल मार्गदर्शन केले. सत्काराला उत्तर देताना प्रो. डॉ.दिवाण सरांनी समाजोपयोगी कार्यात नेहमीच तन-मन -धनाने सहभाग नोंदवण्याचे ठोस आश्वासन दिले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन अंजली तेजस वडमारे यांनी केले. या कार्यक्रमास परिसरातील अंजली विशाल वडमारे, सरिता खेमाडे,अशा धनवे, कोमल वाघमारे,अर्चना जाधव,



## पंकजाताईं साहेबांना अगोदरच सांगितले असते तर मुलीचा जीव वाचला असता

# डॉ. गौरी पालवेंच्या आई-वडिलांनी केला आक्रोश ना. पंकजाताई मुंडे यांनी न्याय भूमिका घेण्याचा दिला शब्द

बीड ।प्रतिनिधी

पंकजाताई साहेब, तुम्हाला मी अगोदरच सांगितले असते तर माझ्या मुलीचा जीव वाचला असता की हो.. असा आक्रोश डॉ गौरी पालवेच्या आई-वडिलांनी आज ना. पंकजाताई मुंडे यांच्यासमोर केला. याप्रकरणात न्याय भूमिका घेऊ असा शब्द ना. पंकजाताईंनी यांनी पालवे परिवाराला दिला.

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी आज संध्याकाळी पिंपळनेर येथे जाऊन डॉ गौरी पालवेंच्या आई-वडिलांची भेट घेतली व सांत्वन करत त्यांना धीर दिला.

# शुभम बोरखेडे व सोनू केमकर यांना विनयभंग, अत्याचार व प्रकरणात जामीन मंजूर

## अँड. योगेश टेकाडे पाटील यांच्या प्रभावी युक्तिवादाची दखल

बीड ।प्रतिनिधी

अल्पवयीन मुलीच्या कथित अपहरण, विनयभंग व लैंगिक अत्याचाराच्या आरोपांमुळे जिल्ह्यात खळबळ माजवणाऱ्या बोरखेड प्रकरणात आरोपी शुभम नंदकुमार बोरखेडे व सोनू उर्फ सोनू मधुकर केमकर या दोघांना जिल्हा व सत्र न्यायालयाचे मा. जिल्हा मुख्य न्यायाधीश आनंद यावलकर यांनी जामीन मंजूर केला आहे.

फिर्यादी विद्यार्थीनीने दिलेल्या तक्रारीनुसार, दिनांक ०१ ऑगस्ट रोजी शाळेत जात असताना तीन अनोळखी युवकांनी तिला जबरदस्तीने कारमध्ये टाकून विनयभंग केला व धमक्या दिल्याचे म्हटले होते. तक्रारीवरून पोलीसांनी आरोपींवर अपहरण, विनयभंग, लैंगिक अत्याचार तसेच झजउडज कायद्यांतर्गत गंभीर स्वरूपाची कलमे लावून गुन्हा दाखल केला. आरोपींना त्यानंतर अटक करून न्यायालयात हजर करण्यात आले होते.

जामीन सुनावणीतील प्रभावी युक्तिवाद

जामीन सुनावणीदरम्यान आरोपींच्या वतीने अ‍ॅड. योगेश टेकाडे पाटील यांनी प्रकरणातील महत्त्वाच्या विसंगती व तपासातील त्रुटी न्यायालयासमोर मुद्देसूद मांडल्या. फिर्यादीच्या कथनातील परस्परविरोधी माहिती, वाहन क्रमांक व ओळख प्रक्रियेतील तफावत, वैद्यकीय पुराव्यांची अनिश्चितता, तसेच आरोपी निष्पाप असून त्यांची गुन्हेगारी पार्श्वभूमी नसल्याचे युक्तिवाद ठेवले.तसेच आरोपी पळून जाण्याचा किंवा साक्षीदारांवर दबाव आणण्याचा कोणताही संभव नसल्याचे स्पष्ट करण्यात आले. या सर्व मांडणीमध्ये अ‍ॅड. वैभव होळकर



यांनी सहकार्य केले.

न्यायालयाचा आदेश

दोन्ही बाजूंचे युक्तिवाद ऐकल्यानंतर, मा. जिल्हा मुख्य न्यायाधीश आनंद यावलकर यांनी प्राप्त पुराव्यांच्या प्राथमिक स्वरूपाचा विचार करून आरोपींना कडक अटींसह जामीन मंजूर

# कै.तेजम्माबाई वैजनाथप्पा देवणे यांचे निधन

मुक्रमाबाद ।प्रतिनिधी

मुखेड तालुक्यातील मुक्रमाबाद येथील वीरशैव समाजातील जेष्ठ महीला तेजम्माबाई वैजनाथप्पा देवणे ( वय ८८ ) यांचे दि.२५ रोजी दु.२ वा. अल्पशहा आजाराने दु:खद निधन झाले.



अंत्यसंस्कार दि.२५ बुधवार २ वाजता वीरशैव लिंगायत स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे असे त्यांच्या नातलगांनी सांगितले आहे.त्यांच्या पाश्चात्य तीन मुल, चार मुली, सुना,नातु, पंतु,असा मोठा परिवार आहे. ते मुक्रमाबाद येथील रहिवासी राजु वैजनाथप्पा देवने यांचे आई होत.

# किनवट तालुक्यातील काँग्रेस पदाधिकाऱ्यांची जिल्हा कार्यकारणीवर निवड



किनवट /प्रतिनिधी

काँग्रेस पक्षाच्या संघटनात्मक बळकटीसाठी आणि नांदेड जिल्ह्यातील कार्यकारिणीला नवे गतिमान नेतृत्व मिळावे या उद्देशाने काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिनांक २४ नोव्हेंबर रोजी नांदेड जिल्हा काँग्रेस कमिटी अध्यक्ष राजेश पावडे यांना पत्र पाठवून नांदेड उत्तर जंबो कार्यकारिणी जाहीर केली. या नव्या कार्यकारिणीत किनवट तालुक्यातील तीन महत्वाच्या काँग्रेस पदाधिकाऱ्यांना प्रमुख जबाबदाऱ्या देण्यात आल्या असून किनवट तालुक्याच्या राजकीय वर्तुळात या नियुक्त्यांची विशेष चर्चा सुरू आहे.

तीन पदाधिकाऱ्यांना जिल्ह्यात मानाचे स्थान या कार्यकारिणीत माजी नगराध्यक्ष के. मूर्ती यांची जिल्हा उपाध्यक्ष पदी निवड झाली आहे. किनवट नगरपरिषदेचे माजी प्रथम नागरिक म्हणून त्यांनी केलेल्या कामाचा आणि दीर्घ राजकीय अनुभवाचा विचार करून ही जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

काँग्रेसच्या धडाडीच्या कार्यकर्त्या नंदिनी टारपे यांचीही जिल्हा उपाध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांनी काँग्रेसमध्ये विविध पदांवर काम करताना केलेले संघटनबळ वाढवण्याचे कार्य, महिलांना राजकारणात सक्रिय करण्यासाठी घेतलेले पुढाकार आणि ग्रामीण भागातील जनसमस्या घेऊन केलेला संघर्ष याची दखल पक्षाने घेतली आहे.

सिराज जिवानी या निष्ठावान व जुन्या काँग्रेस कार्यकत्याची जिल्हा सरचिटणीस पदी निवड झाली असून त्यांच्या संघटन कौशल्यामुळे आणि पक्षनिष्ठेमुळे जिल्हा पातळीवर काँग्रेसची ताकद वाढेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

दोन दिवसांपूर्वीच प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांची किनवट येथे जोरदार सभा पार पडली होती. या सभेमध्ये पक्ष संघटन, स्थानिक समस्या आणि आगामी निवडणुकांवर व्यापक चर्चा झाली. या सभेनंतर अवघ्या दोन दिवसातच किनवट तालुक्यातील तीन कार्यकर्त्यांना मिळालेल्या नियुक्त्या हे प्रदेशाध्यक्षांच्या दौऱ्याचे तात्काळ फलित मानले जात आहे. किनवट तालुक्याला जिल्हा पातळीवरील नेतृत्वात मिळालेला हा मोठा सन्मान असल्याने स्थानिक काँग्रेसमध्ये विशेष उत्साहाचे वातावरण असून कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे. आगामी काळात या नव्या नियुक्त्यांमुळे किनवट तालुक्यात काँग्रेसची संघटनशक्ती वाढून राजकीय समीकरणांवर याचा प्रभाव पडणार असल्याचे बोलले जात आहे.

# घुंगराळा येथील खंडोबा यात्रेची तयारी पूर्ण

## कुस्ती स्पर्धा व कृषी पशु प्रदर्शन



नायगाव /प्रतिनिधी

नायगाव तालुक्यातील बरबडा सर्कल अंतर्गत असलेल्या घुंगराळा ता.नायगाव येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही खंडोबा देवाची यात्रा भरणार असून या यात्रेत कुस्ती स्पर्धा,कृषी व पशु प्रदर्शन या कार्यक्रमासोबत इतरही कार्यक्रम मोठ्या उत्साहात व भक्ति भावाने साजरे होणार आहेत अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस तथा गावचे उपसरपंच वसंत सुगावे पाटील यांनी दिली आहे.

दिं. २६ नोव्हेंबर रोजी कुंटुर येथून खंडोबा देवाच्या पालखीचे दुपारी घुंगराळा येथे आगमन होईल त्यानंतर सायंकाळी खंडोबा मंदिरावर गावकऱ्यांच्या वतीने सामूहिक आंबील जेवणाचा कार्यक्रम होईल.

त्यानंत दिं. २७ नोव्हेंबर रोजी घुंगराळा येथील जिल्हा परिषद शाळेच्या मैदानावर दुपारी १ वा.कुस्ती स्पर्धा सुरू होतील सदर कुस्ती स्पर्धेच्या उद्घाटन समारंभास जिल्ह्यातील विविध विभागाचे प्रशासकीय अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

तसेच दिं. २८ रोजी सकाळी १०.३० वा.भव्य कृषी व पशु प्रदर्शन हा कार्यक्रम होईल या कार्यक्रमास पंचक्रोशीतील शेतकरी, पशुपालक ,कृषी व पशुसंवर्धन विभागाचे अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

यासह यात्रेत विविध खाद्यपदार्थांचे दुकाने, खेळणीचे दुकाने,भांड्याचे दुकाने,कापड दुकाने आदी वस्तूंचे छोटी मोठी दुकाने मोठया प्रमाणावर लावण्यात येतात.सदर यात्रेचे नियोजन ग्रामपंचायत, सेवा सहकारी सोसायटी,खंडोबा मंदिर ट्रस्ट,यात्रा समिती यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व संस्थाचे पदाधिकारी, कर्मचारी करत आहेत.यात्रेकरिता ग्रामपंचायत कार्यालय, घुंगराळा यांच्यातर्फे गावात साफसफाई, दिवाबत्ती, पाणी व्यवस्थापन आदी कामे ग्रामपंचायत कडून केली जात आहेत.सदर यात्रा ही गावकऱ्यांच्या लोकवर्गणीतून केली जात असून माळेगाव नंतर जिल्ह्यातील क्रमांक दोन ची यात्रा म्हणून या यात्रेकडे पाहिले जाते. या यात्रेत जिल्ह्यातील भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने येऊन यात्रेचा आनंद घ्यावा असे आवाहन यात्रा समितीमार्फत केले आहे.

# किनवट मध्ये गुरुवारी वंचित बहुजन आघाडीची सभा

**किनवट /प्रतिनिधी**

**नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडी तर्फे गुरुवार, दि. २७ नोव्हेंबर रोजी सायं. ५ वाजता दुर्गा मैदान, किनवट येथे एक जाहिर सभा आयोजित करण्यात आली आहे. या सभेसाठी पक्षाचे नेते सुजात आंबेडकर यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये संपन्न होणार असल्याची माहिती देण्यात आली आहे. नगराध्यक्ष पदासाठी वंचित बहुजन आघाडीतर्फे शाहेदा शेख शब्बीर या निवडणुक लढवत आहेत. तसेच प्रभागामध्ये पुढील उमेदवारांचा समावेश आहे : प्रभाग क्र. २ (ब) : मोहम्मद अली काहार खान, प्रभाग क्र. ४ (अ) : संगीता नामदेव कनिंदे, प्रभाग क्र. ६ (अ) : अरसलान अकबर खान प्रभाग क्र. १० (ब) : पुष्पलता माधवराव मुनेश्वर.**

सभेच्या आयोजनाची जबाबदारी कार्यकर्त्यांचा गट सांभाळत असून त्यात निखिल वाघमारे (ता.अध्यक्ष), सुरेश मुनेश्वर, प्रविण गायकवाड, दूधराम राठोड, दीनेश कांबळे, राहुल चौदंते, सुधकार हलवले, शेख याकुब आणि विशाल जोंधळे यांचा समावेश असल्याची माहिती दिली आहे. शहरातील काही रस्त्यांवर वंचित बहुजन आघाडीचे बॅनर्स आणि झेंडे लावण्यात आल्याचे दिसून येत आहे. सभेसाठी नागरिक उपस्थित राहतील अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली असली तरी निवडणुकीच्या आदर्श आचारसंहितेचे पालन होण्यासाठी प्रशासनाकडून आवश्यक देखरेख ठेवली जात आहे. या सभेनंतर निवडणुकीचा पुढील प्रचार आणि नागरिकांचा सहभाग यावर स्थानिक पातळीवरील चर्चा वाढण्याची शक्यता असल्याचे निरीक्षण व्यक्त केले जात आहे.

# नावा मनपाच्या प्रभाग २० मधील मतदार प्रभाग क्रमांक १९ मध्ये समावेश , दुरुस्ती करण्याची मागणी..

मतदार नवीन नांदेड - नांदेड वाघाळा महानगर पालिकेने आगामी सार्वत्रिक पंचवार्षिक निवडणूक साठी वार्ड निहाय मतदार यादी अद्यावत करण्यात आली आहे ,या निवडणुकीची प्रभागरचना करताना प्रभाग २० मधील बुथ क्रमांक २३२ असदवन येथील भागाचा समावेश प्रभाग १९ कौठा या मतदार यादीत आल्याने मनपाच्या इच्छूक उमेदवारांनी यावर आक्षेप घेतला आहे असुन ह्या मतदार अद्यावत करा अशी मागणी आयुक्त डॉ.महेश कुमार डोईफोडे मनपा यांच्या केली आहे.

नांदेड वाघाळा महानगर पालिकेची सार्वत्रिक निवडणुकीची प्रभाग रचना आरक्षण यासह मतदान याद्या अध्यावत करण्याचे काम मनपाच्या निवडणुक विभागाकडुन होत आहेत यात विस प्रभागाची रचना करण्यात आली असून सिडको हडको यासह वाघाळा असदवन या भागाचा यात समावेश करण्यात आला असून सर्वात मोठा प्रभाग झाला आहे. तर प्रभाग १९ची करतांना कौठा,वसरणी,असर्जन,धुमाळवाडी यासह अनेक नव्याने अस्तित्वात् आलेले नगर या भागाचा समावेश या प्रभागात करण्यात आले आहे ,सिडको हडको २० प्रभागाची मतदार संख्या हि ३२२८० हजार तर कौठा प्रभागाची २८८०४ हजार आहे. या दोन प्रभागाची मतदार यादी करताना मनपाच्या




निवडणुक विभागो मनपाच्या निवडणुकीच्या अध्यावत याद्याचे अवलोकन करत असताना सिडको -हडको प्रभाग २० मधील असदवन या गावाची विभाजन करत बुथ क्रमांक २३२ येथील अनेक मतदार हे कौठा प्रभागात १९ मध्ये समावेश केल्याने मतदारात संभ्रम झाला असून तात्काळ दुरूस्ती करून पुन्हा येथील असदवन भागाच्या समावेश २० मध्ये करावा याबाबत मनपाचे माजी उपमहापौर विनय गिरडे पाटील ,नगरसेवक प्रतिनिधी संजय घोगरे पाटील,उदय देशमुख, शिवसेना शिंदे गटाचे शहरप्रमुख सुहास पाटील खराणे,माजी नगरसेवक राजु गोरे, राजु पाटील काळे पाटील ,सिध्दार्थ गायकवाड, सतिश बस्वदे,राजु लांडगे यांनी मनपाच्या निवडणुक विभागाकडे प्रारुप मतदान यादीवरुन आक्षेप नोंदवला आहे. या मतदान याद्या दुरूस्ती करुन सिडको हडको प्रभागातील असदवन येथील मतदारांना पुन्हा प्रभाग २० मध्ये घ्यावे अशी मागणी मनपा आयुक्त डोईफोडे यांच्याकडे केली आहे.

# तामसा येथील राम मंदिरात महाआरतीला राम भक्तांची गर्दी

तामसा /प्रतिनिधी

तामसा येथील राम मंदिरात अयोध्येतील राम मंदिरावर ध्वजारोहणाच्या औचित्याने घेण्यात आलेल्या महाआरतीला प्रतिसाद मिळाला असून रामभक्तांनी आरती व दर्शनासाठी मंदिरात गर्दी केली होती.

यानिमित्त सुमनबाई निलावार यांच्या हस्ते मंदिर परिसरातील नव्या भरवण्यात आलेल्या ध्वजाचे पूजन करून अनावरण झाले. मंदिरातील श्रीराम सीता लक्ष्मण यांच्या मूर्तीची सामूहिक आरती झाली. मंदिर परिसर जयश्रीरामच्या घोषणांनी दणाणून गेला होता. यावेळी बालाजी मंदिराचे विश्वस्त स्वप्निल बंडेवार यांनी अयोध्येतील मंदिरावरील ध्वजाची माहिती सांगितली.यावेळी मंदिराचे पुजारी



अमोल तामसेकर, भाजपाचे तालुकाध्यक्ष भागवत देवसरकर ज्येष्ठ व्यापारी दीपक बंडेवार,शशिकांत बंडावार, सचिन तांदळे,बाजार समितीचे माजी उपसभापती विशाल परभणकर,भाजप शहराध्यक्ष शिवराज वारकड, दीपक देशमुख, भाजप पदवीधर प्रकोष्ठ महेश मठपती,अर्जुन जोशी, गजानन लाभसेटवार, डॉ. दीपक नाईक,गणेश शिंदे, किरण वारकड,अमोल वाळकीकर,आशिष बीजमवार यांच्यासह महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# श्री अय्यापा स्वामी दीक्षा कालावधी प्रारंभ

किनवट /प्रतिनिधी

श्री अय्यप्पा स्वामींच्या दीक्षा कालावधीला आजपासून विधिवत प्रारंभ झाला असून मार्गशीर्ष मास ते मकर संक्रांती या काळात केली जाणारी ही साधना अत्यंत कठोर व शिस्तपालनाची मानली जाते. या ४१ दिवसांच्या कालावधीत भाविक वैराग्य, ब्रह्मचर्य आणि संन्यास या तिन्ही आयुधांचे काटेकोर पालन करतात. दीक्षा धारण केलेल्या प्रत्येक स्वामीला या काळात पूर्ण संयम, शुचिर्भूत आचार आणि भक्तिभाव यांचे पालन बंधनकारक असते. दीक्षेच्या काळात पहाटेच्या थंडीत थंड पाण्याने अंघोळ, त्यानंतर पूजापाठ, जमिनीवर झोपणे, एकवेळचे भोजन, तसेच शारीरिक-मानसिक शुचिता राखणे अशा नियमांचे पालन करावे लागते. दिनचर्या पवित्र राहावी यासाठी शौचालय वापरल्यानंतर, जेवणापूर्वी, पूजेपूर्वी अशा विविध प्रसंगी दिवसातून चार ते पाच वेळा अंघोळ करणे अनिवार्य असते. त्यामुळे हा कालावधी अत्यंत कठीण आणि तपश्चर्येसमान मानला जातो. दीक्षा घेणाऱ्या भाविकांसाठी ४१ दिवसांचा मंडळ कालावधी अत्यावश्यक असून, पहिल्यांदा दीक्षा घेतलेल्या स्वामींनी शबरीमाला येथे



प्रत्यक्ष जाऊन भगवान अय्यप्पांचे दर्शन घेणे आवश्यक मानले जाते. दरवर्षीप्रमाणे ७ जानेवारी रोजी पंचक्रोशीतील गावांचा सहभाग असलेला महाप्रसाद भंडारा किनवट येथील श्री अय्यप्पा मंदिरात आयोजित करण्यात येणार असून, यामधून शबरीमाला यात्रेकरूंना पारंपरिक पद्धतीने रवाना केले जाते.

किनवट शहरातील श्री अय्यप्पा स्वामी मंदिर, श्री नर्मदेश्वर मंदिर, श्री गजानन महाराज मंदिर, श्री ब्रह्मगारू गायत्री व विश्वकर्मा मंदिर या प्रमुख ठिकाणांवर पवार गुरु स्वामी , विलास गुरु स्वामी, सातूरवार गुरु स्वामी, जलगमवार गुरु स्वामी, देवराव गुरु स्वामी, गोनेवार गुरुस्वामी, चंद्रशेखर नेम्मानिवार यांच्या पुढाकाराने तसेच तालुक्यातील विविध गावांमध्ये अय्यप्पा स्वामी भक्त वास्तव्यास असून त्यांच्याद्वारे नित्य साधना सुरू केली आहे. तर यावेळी दानशूर व्यक्तीकडून मोठ्या प्रमाणात सढळ हाताने अन्नदान केले जाते.

दररोज मोठ्या प्रमाणात भजन करत भगवंताची पूजा अर्चा केली जाते तर प्रत्येक बुधवारी पहाटे पडी पूजेचे आयोजन करण्यात येते ज्यामध्ये पंचमेवा, मध, दूध दही तुपासह विविध फळांचे नैवेद्य व अभिषेक करण्यात येतो. तर काही भाविक या दरम्यानच्या काळात आपल्या घरी मोठ्या प्रमाणात पडी पूजेचे आयोजन करतात. ज्या करिता केरळ राज्यातील नंबुद्री ब्राह्मण गुरु उपस्थित राहतात तर परिसरातील ४ ते ५ हजार भाविक उपस्थित राहतात.या यात्रेचा मुख्य हेतू म्हणजे मकर संक्रांती निमित्त प्रगट होणाऱ्या दिव्य 'मकर ज्योती'चे दर्शन, जे प्रत्येक अय्यप्पा भक्तासाठी अत्यंत पवित्र आणि आयुष्यभरातील स्मरणीय अनुभव मानला जातो. अय्यप्पा स्वामी दीक्षेच्या प्रारंभाने संपूर्ण परिसर भक्तिभावाने भारून गेला असून, पुढील काही दिवसांत विविध उपक्रम, पूजा-अर्चा व आध्यात्मिक कार्यक्रमांना मोठ्या प्रमाणावर भाविक उपस्थित राहणार असल्याची माहिती स्थानिक मंडळांनी दिली आहे.

# श्रीमती विजया बाई जहागीरदार यांचे निधन



नांदेड/प्रतिनिधी

दै.पुण्यनगरीचे जिल्हा प्रतिनिधी कालिदास जहागीरदार यांच्या मातोश्री आणि भाग्यनगर मधील जेष्ठ रहिवासी श्रीमती विजयाबाई माणिकराव जहागीरदार-८४ यांचे मंगळवारी दुपारी २.१५ वाजता वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर मंगळवारी सायंकाळी ८.३० वाजता गोवर्धन घाट येथील शांती धाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात मुले महेश, कालिदास,मुलगी सौ प्राची गोसावी ,,जावई,२ सुना, नातवंडे ,५ भाऊ ,५ बहीणी असा मोठा परिवार आहे.

# विविध अपघातात ५ जखमी; जगद्गुरु नरेंद्रचार्य रुग्णवाहिकेची सेवा वरदान ठरते



अर्धापूर प्रतिनिधी अपघाताच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असून अपघातात मृत्यूंचाही आकडा वाढत आहे. सोमवारी दोन तर मंगळवारी दोन अपघात झाले असून या अपघातात पाच जण जखमी झाले आहेत.

गत काही दिवसापासून अपघातांच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. अपघाताचे प्रमाण कमी व्हावे यासाठी प्रशासनाकडून नियोजनाच्या अभाव दिसून येत आहे. दि.२४ सोमवार रोजी सायंकाळी चार वाजता दुचाकी समोर कुत्रा आल्याने गाडी स्लिप होऊन विश्वनाथ उत्तमराव पवार वय ३२ वर्षे रा. निवघा ता. मुदखेड हे जखमी झाले आहेत. तर सोमवारीच सायंकाळी सहा वाजताच्या सुमारास नांदेड-हिंगोली रोडवर तामसा पाटीजवळ पाठीमागून येणाऱ्या कारची दुचाकी धडक बसली यात शेख जमीर शेख रजाक वय ४२ वर्ष रा. वसमत जिल्हा हिंगोली हे जखमी झाले आहेत.

दि.२५ नोव्हेंबर मंगळवार रोजी सकाळी भोकर नांदेड रोडवर येळेगाव पाटी जवळ एका पंपा समोर कार समोर वन्य प्राणी आल्याने प्राण्याच्या बचाव करताना कारवरील ताबा सुटला अपघात झाला यावेळी नितीन गोपाळराव नाईकवाडे वय ते ३० वर्षे रा. मालेगाव ता.अर्धापूर हे जखमी झाले आहेत. तर दि.२५ मंगळवारीच नांदेड- अर्धापूर रोडवर खडकुत पाटी जवळ अचानक दुचाकीसमोर कुत्रा आल्याने गाडी स्लिप झाली. अनुसयाबाई हनुमंत गुंडे वय ५५ वर्षे रा. गुंडेवाडी ता. लोहा , शंकर गणपती सूर्यवंशी वय ४० वर्षे रा. बारड ता. मुदखेड हे जखमी झाले आहेत. वरील अपघातात काहींची प्रकृती चिंताजनक आहे तर काही गंभीर जखमी आहेत. सदर चारही अपघाताची माहिती मिळता क्षणी जगद्गुरु नरेंद्रचार्य संस्थान नाणिजधाम रुग्णवाहिका चालक राजू पाचंगे यांनी घटनास्थळी धाव घेत जखमींना तात्काळ रुग्णालयात दाखल केले.

# किनवट नगर परिषद निवडणूक २०२५ : २६ नोव्हेंबरला उमेदवारांना चिन्ह वाटपाची प्रक्रिया

**किनवट : राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार किनवट नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक-२०२५ च्या टप्पेनिहाय कार्यक्रमाची अंमलबजावणी सुरु झाली आहे. या कार्यक्रमातील महत्त्वपूर्ण टप्पा म्हणून येत्या बुधवारी, दि. २६ नोव्हेंबर २०२५ रोजी निवडणूक लढविणाऱ्या सर्व वैध उमेदवारांना निवडणूक चिन्हांचे वाटप करण्यात येणार आहे.**

**नगर परिषद** निवडणुकीसाठी नामांकन पत्रांची छाननी पूर्ण होऊन वैध उमेदवारांची यादी निश्चित झाली आहे. त्यानंतरच्या प्रक्रियेनुसार प्रत्येक प्रभागात अध्यक्ष व सदस्य पदासाठी उभे असलेल्या उमेदवारांना त्यांचे अधिकृत निवडणूक चिन्ह देण्यात येणार आहे. सकाळी ११.०० वाजल्यापासून ही कार्यवाही नगर परिषद कार्यालयात पार पडणार आहे.

तहसीलदार तथा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. शारदा चौंडेकर यांनी जारी केलेल्या अधिकृत प्रसिद्धीपत्रकात नमूद केल्याप्रमाणे, सर्व उमेदवारांनी आवश्यक कागदपत्रांसह वेळेवर उपस्थित राहणे गरजेचे आहे. चिन्हवाटपाची प्रक्रिया प्रभागनिहाय आणि पारदर्शक पद्धतीने करण्यात येणार असून, यानंतर प्रत्येक उमेदवाराला त्यांच्या प्रचाराची दिशा अधिकृतरीत्या ठरलेले निवडणूक चिन्ह मिळणार आहे.

चिन्ह वाटप ही निवडणुकीतील अत्यंत महत्त्वाची पायरी असून, यानंतर प्रचारयुद्धाला वेग येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. स्थानिक राजकीय वातावरणातही उमेदवारांच्या प्रचाराची चुरस वाढू लागली आहे.डॉ. शारदा चौंडेकर यांनी सर्व उमेदवार व त्यांच्या प्रतिनिधींना आवाहन केले आहे की, दि. २६ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता नगर परिषद कार्यालयात उपस्थित राहून चिन्ह वाटपाची कार्यवाही नियमांनुसार पूर्ण करण्यासाठी सहकार्य करावे.निवडणूक प्रक्रियेचा हा टप्पा सुरळीतरीत्या पार पाडण्यासाठी प्रशासनाकडून सर्व तयारी पूर्ण झाल्याची माहितीही देण्यात आली आहे.